पश्चिम विदर्भातील सर्वाधिक अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला

● वर्ष १६ ● अंक ६१ ● रविवार, दि. ६ सप्टेंबर २०२६ ● मूल्य ५ ● पृष्ठे ८

RNI No.- MAHMAR/2012/49642 | Postal Regn. No. AKL DN/283/2024-26 | Web. https://epaper.citynewssuperfast.com

**सुविचार**

"विश्वास हा खोडरबरसारखा असतो, तुम्ही केलेल्या प्रत्येक चुकीबरोबर तो कमी होत जातो."




# गणेशोत्सवात दंगल घडवण्याचे षडयंत्र!

## मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे यांचा दावा, देशातील प्रश्नांना बगल देण्याचा प्रयत्न



प्रतिनिधी | ६ सप्टेंबर

**मुंबई :** देशातील ज्वलंत प्रश्नांना बगल देण्यासाठी येणाऱ्या गणेशोत्सव काळात दंगल घडवण्यात येणार असल्याचा खळबळजनक दावा मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी आज केला. देशातील प्रश्नांना बगल देण्यासाठी दंगली घडवण्याचा डाव असून त्यासाठी मोठी यंत्रणा राबवली जात असल्याचा आरोपही त्यांनी केला. पण भाजपमधील लोक त्यावर बोलू शकत नाहीत, असे ते म्हणाले. या राज्याचे नागरीक म्हणून तुम्ही सतर्क राहा. जाणीवपूर्वक ते हे करतील, तुम्ही या गोष्टीपासून दूर राहा असे आवाहन त्यांनी केले. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचा राज्यस्तरीय पदाधिकारी मेळावा आज ६ सप्टेंबर २०२६ रोजी ठाण्यातील राम गणेश गडकरी रंगायतन नाट्यगृहात होत आहे. यावेळी राज ठाकरे यांनी देशातील विविध प्रश्नांवर मोठे भाष्य केले. त्यांनी सत्ताधारी भाजप सरकारवर सडकून टीका केली. त्यांनी यावेळी राज्यात दंगलीचे षडयंत्र घडवण्याचा डाव असल्याचा आरोप केला. त्यांच्या या आरोपामुळे एकच खळबळ उडाली आहे.

### तुम्हाला गुंतवून ठेवणे हा एकच कार्यक्रम

'तुम्हाला मुद्दाम गुंतवून ठेवले जात आहे. सोशल मीडियावर पण हा मुद्दा चर्चेत आहे. तुमचं इतर गोष्टीकडं दुर्लक्ष झालं पाहिजे. आताच मुंबईत त्याची झलक पाहिली तुम्ही. एक दोन घटना घडल्या, ही सुरुवात आहे. जो सुजाण हिंदू आहे. जो सुजाण मुस्लिम आहे. दोघांनाही सांगायचंय की सतर्क राहा. आपल्या नावाने, त्यांच्या नावाने यामध्ये कुणीतरी घुसवतील आणि दंगली घडवतील. हकनाक आपली पोरं जातील, त्यांची पोरं जातील. तिकडेच लक्ष जाईल तुमचं. एक दुसऱ्याचा दुस्वास करणे आणि त्यात गुंतवून ठेवणे, मूळ परिस्थितीकडे दुर्लक्ष करायला लावणे इतकाच कार्यक्रम आता सुरू आह, असे मोठा दावा राज ठाकरे यांनी केला.

### मराठी-हिंदी वादावर काय आवाहन?

मराठी शिकण्याच्या मुद्दावर अमराठी भाषिकांना मुद्दामहून डिवचणारे वक्तव्य करायला लावले जात असल्याचा आरोप राज ठाकरे यांनी केला. हे मराठी लोक काय उखडतील? मराठी नाही बोलणार. हे बोलायला लावतायेत जेणेकरून तुम्ही त्यात अडकाल. आता नवी मुंबईत हिंदी भाषिक संमेलन होत आहे. अमित शाह वैगरे येणार आहेत तिथे. लगेच बातम्या सुरू झाल्या. महाराष्ट्रात हिंदी संमेलन होत असल्याचा बातम्या आल्या. हे संमेलन होऊन जाऊ द्या. दुर्लक्ष करा त्या गोष्टीकडे. हिंदी संमेलनाला येऊन सुद्धा अमित शाह यांचं हिंदी चांगलं नाही होऊ शकत. कारण तेही परेस, जयेस वालेच आहेत, असा चिमटा राज ठाकरे यांनी काढला.

## »थोडक्यात

### विशाखा राऊत यांचे नगरसेवकपद रद्द

**मुंबई :** मुंबईच्या माजी महापौर आणि शिवसेना ठाकरे गटाच्या नेत्या विशाखा राऊत यांना मोठा धक्का बसला आहे. जात प्रमाणपत्र अवैध ठरल्याच्या प्रकरणात त्यांचे नगरसेवकपद रद्द करण्यात आले आहे. यासंदर्भातील अधिसूचना राज्याच्या नगरविकास विभागाने शुक्रवारी जारी केली. आता येत्या सोमवारी मुंबई महानगरपालिकेच्या महासभेत त्यांचे नगरसेवकपद रद्द झाल्याची औपचारिक घोषणा होणार आहे. विशाखा राऊत या मुंबई महापालिकेतील अनुभवी नगरसेविका म्हणून ओळखल्या जातात. त्यामुळे त्यांचे पद रद्द होणे हा शिवसेना ठाकरे गटासाठी मोठा राजकीय धक्का मानला जात आहे.

# भक्ती, श्रद्धा अन् परंपरेचे दर्शन घडणार एकाच ठिकाणी!

## श्री राजेश्वरोत्सव महाकावड यात्रा : आरआरसीच्या सर्व सोशल मीडिया प्लॅटफार्मवर उपलब्ध

प्रतिनिधी | ६ सप्टेंबर

**अकोला :** श्रावण महिन्याच्या शेवटच्या सोमवारी अकोल्यातील श्री राजराजेश्वर मंदिरातून निघणारी पारंपरिक महाकावड यात्रा व पालखी सोहळा ही केवळ एक प्रथा नसून भक्तांच्या अंतःकरणात उगम पावणारी दिव्य अनुभूती आहे. तसेच भक्ती, श्रद्धा अन् परंपरेचा अनोखा संगम असलेल्या या लोकोत्सवाचे थेट प्रसारण यंदाही आर आर सी नेटवर्क आपल्या लाखो दर्शकांसाठी करीत आहे. यंदा या सोहळ्याचे विशेष आकर्षण शिवभक्त आ. संतोष बांगर आणि आ. बच्चू कडू राहणार आहेत.

सोमवार, सकाळी ८ ते रात्री १० या काळात घरबसल्या भाविकांना महाकावड यात्रेचा उत्साह, जलाभिषेकातील समर्पण, सामूहिक एकतेचा पालखी सोहळा आणि भक्तिरसाने न्हालेली विहंगम दृश्ये





अनुभवता येणार आहेत. कावडीच्या प्रत्येक पावलात भक्ती आणि पालखीच्या प्रत्येक हालचालीत श्री राजराजेश्वर महाराजांचा आशीर्वाद जाणवणार आहे. ज्या दर्शकांच्या घरी आर आर सी व डेन बॉक्स त्यांना चॅनल क्रमांक १९० व ८८९ हा सोहळा थेट अर्थात लाईव्ह सोमवारी पाहता येईल.

तर ज्या दर्शकांच्या घरी जीटीपीएल बॉक्स त्यांना चॅनल क्रमांक ७२ व ७३ वर हा सोहळा थेट पाहता येईल. त्याच बरोबर आर आर सी नेटवर्कचे यु ट्यूब, इन्स्टाग्राम आणि फेसबुक या सर्व सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर श्री राजेश्वरोत्सवाच्या महाकावड यात्रेचे लाईव्ह कव्हरेज पाहता येणार आहे. या वर्षी आर आर सी ने भाविकांसाठी अतिरिक्त कॅमेऱ्यांसह ड्रोन दृश्ये उपलब्ध करून दिली आहेत. आकाशातून टिपले जाणारे कावड यात्रेचे भव्य क्षण आणि जमिनीवरून टिपलेले भक्तिरसात बुडालेले दृश्य यांची एकत्रित मेजवानी भाविकांना अनुभवता येणार आहे.ज्यांना प्रत्यक्ष मंदिरात हजर राहता येणार नाही, त्यांच्यासाठी हे प्रसारण म्हणजे ईश्वरदर्शनाचे सुवर्णद्वार ठरणार असून आपण घरबसल्या श्री राजराजेश्वर महाकावड यात्रेतील सुवर्ण क्षणांचे प्रत्यक्ष साक्षीदार होण्याची संधी आर आर सी समूहाने खास आपल्यासाठी उपलब्ध करून दिली आहे. तर चला सज्ज व्हा, या सुवर्णक्षणाचे साक्षीदार होण्यासाठी.

### शिवभक्त आ. संतोष बांगर, आ. बच्चू कडू यांची विशेष उपस्थिती

अकोल्याचा लोकोत्सव असलेल्या महाकावड व पालखी सोहळ्याचे वैभव दिवसेंदिवस वाढत आहे. श्री राजेश्वरोत्सव सोहळ्यानिमित्त शिवभक्त संतोष बांगर आणि आ. बच्चू कडू यांचे आगमन होणार असून, त्यांची या सोहळ्याला विशेष उपस्थिती राहणार आहे.







महाकावड यात्रा 2026 लाईव्ह कव्हरेज

सोमवार, 7 सप्टेंबर रोजी सकाळी 8 :00 ते रात्री 10 पर्यंत पहा

हा सोहळा देशभरात कुठेही घरबसल्या बघा एका क्लिकवर...

Facebook RRCDigital | Instagram rrc_news_mh | Youtube @rrcnews_akola

# खेंडकर ज्ञानगंगेत श्रीकृष्ण जन्माष्टमी व शिक्षक दिन उत्साहात साजरा

प्रतिनिधी ६ सप्टेंबर





**अकोला :** वाशिम बायपासस्थीत खेंडकर ज्ञानगंगे मध्ये श्रीकृष्ण जन्माष्टमी व शिक्षक दिन उत्सव अत्यंत जल्लोषात साजरा करण्यात आला. 5 सप्टेंबर रोजी शिक्षक दिन व काही निराहो जन्माष्टमीनिमित्त शाळेच्या भव्य प्रांगणामध्ये विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी बऱ्याच दिवसानंतर पावसाने रिमझिम हजेरी लावली तरीसुद्धा रिमझिम पावसात चिमुकल्या विद्यार्थ्यांनी दहीहंडी व कला नृत्य सादरीकरणाचा कार्यक्रम जल्लोषात केला. दरम्यान विद्यार्थ्यांनी राधा, कृष्ण, देवकी, सुदामा, बलराम, वासुदेव अशा विविध वेशभूषा साकरल्या होत्या. विद्यार्थ्यांनी छोट्याशा नाट्यरूपामध्ये कृष्णलीला मांडल्या. नर्सरी ते वर्ग नववी पर्यंतच्या विद्यार्थ्यांनी विविध प्रकारचे कृष्ण गीतांवर नृत्य सादर केले. तर चिमुकल्या विद्यार्थ्यांच्या हस्ते दहीहंडी फोडून कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला.

यावेळी कार्यक्रमाचे उद्घाटन स्थानिक गुन्हे शाखा अकोला येथे सध्या कार्यरत असलेले अकोला वाहतूक विभागाचे पोलीस निरीक्षक मनोज बहुरे यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्र राज्य खाजगी शिक्षक संघटनेचे राज्य अध्यक्ष व भाजपा ओबीसी ग्रामीण मोर्चाचे अध्यक्ष मनीष गावंडे यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणून माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक निलेश खेंडकर व प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक अल्केश खेंडकर होते. कार्यक्रमाचे संचालन उषा जगदाळे तर आभार प्रदर्शन आशा हिवरकर यांनी केले.

यावेळी शाळेतील शिक्षक सुरेश सुरत्ने, प्रज्ञानंद थोरात, श्रीकांत पागृत, गोपाल वानखडे, प्रशांत काळे, कांचन वानखडे, छाया इंगळे, अंजु मुंढे, रूपाली उन्हाळे, वर्षा मते, माया खोडके, प्रणाली धोटे, मेघा इंगळे, शुभांगी दामोदर, अनिता वानखडे, भाग्यश्री भामद्रे आणि पालकवर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. तर शिक्षकेत्तर यांनी कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यासाठी परिश्रम घेतले.

## अवैध दारु विक्री करणाऱ्या विरुद्ध एसडीपीओ पथकाची कारवाई

**हिवरखेड :** पोलिस स्टेशनच्या हद्दीत येत गावातील सोनवाडी फाट्यावरून महावितरण कंपनी या दरम्यान अकोट एस डी पी ओ उपनिरीक्षक निखिल पाटील यांच्या पथकाने सदरची कारवाई केली यामध्ये आरोपी जवळून देशी दारूचे ८ नग किंमत ८०० रुपये

देशी कोकण २३ नग एक किंमत २३००रुपये एक मोठी मालकाची ओला कंपनीची मोटरसायकल एकूण मुद्देमाल ७३हजार १००रुपयांचा

आरोपी मोतीराम तुकाराम घुंगड यांच्या विरुद्ध कलम ६५ ई नुसार गुन्हा दाखल करण्यात आला सदरची कारवाई अकोट उपनिरीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस कर्मचारी गोपाल निमकर्डे,

बजरंग इंगळे, अनिल सीरसाट यांनी केली पुढील तपास हिवरखेड पोलिस करीत आहेत

# शिवनीच्या सैयद मोहसिन उर्दू हायस्कूल मध्ये शिक्षक दिन साजरा

प्रतिनिधी ६ सप्टेंबर




**अकोला :** यंग मुस्लिम एज्युकेशन अँड सोशल वेल्फेअर सोसायटी पातूर व्दारा संचलित सैयद मोहसीन उर्दू हायस्कूल शिवनी येथे भारतरत्न डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांची जयंती शिक्षक दिन म्हणून उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली.संस्था सचिव सैयद अकबर अब्दुल्ला सर यांच्या मार्गदशना खाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेतील सहायक शिक्षक असीमोद्दीन यांनी केले. पहिल्या सत्रात विद्यार्थ्यांनी सांसकतीक कार्यक्रमाचे माध्यमातुन डॉ सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जिवणकार्यचा व त्याच्या शैक्षणीक विचाराचा परीचय करुन दिले व तसेच शाळेतील मुख्याध्यापक सैयद मोहीब इकबाल यांनी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्ण यांच्या जिवन प्रवासापासुन देशाच्या राष्ट्रपती पदापर्यंतच्या उल्लेखनीये वाटचसली वर प्रकाश टाकला विदयार्थ्याने हा एक दिवस वर्गामध्ये अध्यापनाचे कार्य करून शिक्षकाच्या जबाबदारीचा अनुभव घेतला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना शिक्षकांचे कार्य, जबाबदारी आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासातील शिक्षकांचे महत्त्व यांची जाणीव झाली. कार्यक्रम उत्साहपूर्ण व आनंददायी वातावरणात संपन्न झाला अध्यक्षीय मार्गदर्शनातुनविदयार्थ्याना शिक्षण संस्कार आणी शिक्षका विषयी आदर यांचे महत्व पटवून दिले.

## श्रीकृष्ण जन्माष्टमी निमित्त दिव्य देवयज्ञ

प्रतिनिधी ६ सप्टेंबर



**हिवरखेड :** राष्ट्र निर्माते तथा सनातन वैदिक संस्कृतीचे कीर्तिस्तंभ, धर्म-संस्कृतीचे रक्षक योगेश्वर श्रीकृष्ण यांच्या जन्मोत्सवाच्या पावन निमित्ताने माहेश्वरी महिला मंडळातर्फे दिव्य देवयज्ञाचे आयोजन करण्यात आले. माहेश्वरी महिला मंडळाच्या अध्यक्षा सौ. मनीषा राठी व सचिव सौ. गायत्री टावरी यांच्या नेतृत्वाखाली योगेश्वर श्रीकृष्ण यज्ञशाळा, हिवरखेड येथे हा अनुष्ठान सौ. निशा टावरी यांच्या पौराहित्याखाली संपन्न झाला. धर्म-संस्कृती रक्षणार्थ आयोजित या देवयज्ञात यजमान दाम्पत्य - सौ. वीणा-राजेश राठी, सौ. प्रिया-हरि सदाणी, सौ. मनीषा-राजेश राठी व सौ. सरिता-पंकज राठी यांनी वेदमंत्रांच्या जयघोषात यज्ञात आहुती अर्पण केल्या. या प्रसंगी विशेष उपस्थिती म्हणून कांतादेवी फोफलिया, सौ. रेखा फोफलिया, बोहरा परिवारातील सौ. बबिता, सौ. वैशाली, सौ. शुभ्रा, सौ. कविता, कु. निकिता टावरी, सौ. चंदा राठी व सौ. गायत्री टावरी यांनी गायत्री मंत्रोच्चारासह आहुती प्रदान केली.

## जिल्हा परिषद मुलांच्या व कन्या शाळेत रक्षाबंधन



प्रतिनिधी ६ सप्टेंबर

**अडगांव बु :** येथील जिल्हा परिषद प्राथमिक मुलांची शाळा (इ. 1 ली ते 8 वी) येथे आज रक्षाबंधनचा कार्यक्रम उत्साहात पार पडला.

या कार्यक्रमात इयत्ता 1 ली ते 8 वी पर्यंतच्या विद्यार्थिनींनी विद्यार्थ्यांना राखी बांधून भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी रक्षाबंधन या सणाचे महत्त्व शिक्षकांनी विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. बहीण-भावाच्या नात्यातील प्रेम आणि विश्वासाचे प्रतीक असलेला हा सण कसा साजरा केला जातो याची माहिती देण्यात आली. अशा सणांमुळे विद्यार्थ्यांमध्ये भारतीय संस्कृतीबद्दल आदर आणि एकमेकांबद्दल प्रेम वाढते असे मत यावेळी मुख्याध्यापकांनी व्यक्त केले.

# अकोट तालुक्यात 19 कोतवाल पदांची भरती प्रक्रिया सुरु; 8 सप्टेंबरला आरक्षण सोडत

वि. प्रतिनिधी ६ सप्टेंबर

**अकोट :** अकोट तहसील कार्यालयांतर्गत रिक्त असलेल्या 19 कोतवाल (महसूल सेवक) पदांच्या भरती प्रक्रियेला सुरुवात झाली असून, संबंधित पदांसाठी आरक्षण निश्चित करण्यासाठी 8 सप्टेंबर 2026 रोजी सकाळी 11 वाजता नवीन प्रशासकीय इमारत, पोपटखेड रोड, अकोट येथे सोडत काढण्यात येणार आहे. तहसीलदार, अकोट यांनी जारी केलेल्या जाहीर सूचनेनुसार, जिल्हाधिकारी अकोला यांच्या निर्देशानुसार कोतवाल संवर्गातील रिक्त पदे भरण्याची प्रक्रिया राबविण्यात येत आहे. यासाठी कोतवाल पदांची बिंदुनामावली अमरावती विभागीय कार्यालयामार्फत पडताळण्यात आली असून शासनाच्या आरक्षण नियमांनुसार अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विजाभज, भज-क, अज-ड, विमाप, इमाव, ईडब्ल्यूएस व खुला प्रवर्ग यांचे आरक्षण निश्चित केले जाणार आहे.

सोडत प्रक्रिया उपविभागीय अधिकारी, अकोट यांच्या अध्यक्षतेखाली पार पडणार असून संबंधित गावांतील इच्छुक नागरिकांना उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. नागरिक उपस्थित नसले तरीही नियोजित वेळेनुसार आरक्षण सोडत काढण्यात येणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

आरक्षण निश्चित झाल्यानंतर कोणाला आक्षेप अथवा हरकत असल्यास ती 9 सप्टेंबर 2026 रोजी दुपारी 3 वाजेपर्यंत तहसीलदार तथा सदस्य, कोतवाल भरती समिती, अकोट यांच्याकडे लेखी स्वरूपात सादर करावी लागणार आहे. मुदतीनंतर प्राप्त होणाऱ्या हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत. या भरती प्रक्रियेत तांदुळवाडी, उमरा, अडगाव खुर्द, एदलापूर, पणज, बोचरा, महागाव, वडाळी देशमुख, चंडीकापूर, कुटासा भाग-२, कावसा बु., जऊळखेड, देवरी, बळेगाव, आकोलखेड, आंबोडा, पुंडा, केळीवेळी आणि देवर्डा या 19 साजांतील रिक्त कोतवाल पदे भरण्यात येणार आहेत.

## आर्मी जवानाने शालेय साहित्य वितरित करून आदर्श ठेवला

**अकोट :** तालुक्यातील सावरा,मंचनपूर व उर्दू शाळेमधील विद्यार्थ्यांना भारतीय सैन्य दलात कार्यरत विकास सखाराम बोदडे यांनी वाढदिवसाचा अनावश्यक खर्च टाळून गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप केले आहे. सावरा जि. प.शाळेमध्ये आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पत्रकार वैभव गुजरकार होते. प्रमुख पाहुणे तंटामुक्ती उपाध्यक्ष विकी धांडे, वंचितचे भाऊराव धांडे, कवठा येथील पत्रकार राजेश साविकार, तसेच मंचनपूर येथील निलेश वानखडे , पत्रकार योगपाल लबडे ,रामविजय जवंजाळ मुख्याध्यापिका छाया चौधरी मंचनपूर येथील मुख्याध्यापक, कळंबे, खडसे तसेच उर्दू शाळेचे मुख्याध्यापक मुस्ताक शेख आणि शिक्षक नजर खान उपस्थित होते. कार्यक्रमाचे नियोजन निलेश वानखडे यांनी केले. संचालन अनिल चौधरी यांनी केले.

# तंटामुक्ती अध्यक्षपदी शेख कासम यांची अविरोध निवड



प्रतिनिधी ६ सप्टेंबर

**हातरुण :** येथील ग्रामसभेत तंटामुक्ती समितीच्या अध्यक्षपदी शेख कासम यांची अविरोध निवड करण्यात आली. या निर्णयाचे ग्रामस्थांनी टाळ्यांच्या कडकडाटात स्वागत केले. गावकऱ्यांच्या वतीने शेख कासम यांचा सत्कार करण्यात आला. गावातील तंटे गावातच मिटवून गाव वादमुक्त ठेवण्याचा संकल्प नवनियुक्त अध्यक्षांनी व्यक्त केला. ग्रामसभेला सावरगावच्या सरपंच पती सैय्यद काज़ीम अली, ग्रामपंचायत सदस्य शेख युसुफ आरीफ कुरेशी, भास्कर डोंगरे, वाजीद खान, शारुख पठाण, इमरान शाह, राजाखान, इरफान शाह, तसेच बिट जमादार विजय चव्हाण, रघुनाथ नेमाळे उपस्थित होते.

# महाराष्ट्र ग्रामदान अधिनियम रद्द करण्याच्या प्रस्तावास जिल्हा सर्वोदय मंडळाचा विरोध

प्रतिनिधी ६ सप्टेंबर



**अकोला :** महाराष्ट्र शासनाने प्रसिद्ध केलेल्या 'महाराष्ट्र ग्रामदान अधिनियम नाहीसा करण्याबाबत प्रारूप अधिनियम २०२६' च्या मसुद्याला अकोला जिल्हा सर्वोदय मंडळाने तीव्र हरकत घेतली आहे.

कायदा रद्द करण्याऐवजी त्यातील त्रुटी दूर करून सुधारणा करावी, अशी मागणी करणारे निवेदन जिल्हा सर्वोदय मंडळाचे अध्यक्ष बबनराव कानकिरड ,ज्येष्ठ सर्वोदयी महादेवराव भुईभार, श्रीकृष्ण विखे पाटील, माजी प्रदेश अध्यक्ष डॉ. शि. ना. ठाकूर, आत्माराम शेळके, अनिल मावळे, सत्पालसिंह एललकार यांच्यासह विविध संघटनांचे वतीने जिल्हाधिकाऱ्यांमार्फत शासनाकडे दिले आहे.

निवेदनात म्हटले आहे की, हा कायदा रद्द झाल्यास ग्राममंडळ बरखास्त होऊन ग्रामपंचायत येईल, त्यामुळे गावातील बिनविरोध निवडीची परंपरा संपून राजकीय बेदिली वाढेल. जमिनीची मालकी ग्राममंडळाकडून व्यक्तीकडे गेल्याने खरेदी-विक्रीचे व्यवहार वाढून शेतकरी भूमिहीन होईल व भू-माफिया व राजकीय हस्तक्षेपाने गावे उध्वस्त होतील. विनोबा भावे यांच्या पुढाकाराने कलम २८ अन्वये ग्रामसभेला मिळालेले अधिकार काढून घेणे हे संविधानाच्या भावनेच्या व ग्रामसभा सक्षमीकरणाच्या धोरणाच्या विरोधात आहे. यावेळी सर्व संबंधित घटकांना विश्वासात घेऊन कायद्यात सुधारणा करावी व रद्द करण्याचा प्रस्ताव मागे घ्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

## नगर परिषदेच्या प्रवेशद्वारांना महापुरुषांची नावे देण्याची मागणी

**अकोट :** महात्मा फुले ब्रिगेड सामाजिक संघटना, अकोला जिल्हाच्या वतीने अकोट नगर परिषदेच्या दोन्ही प्रमुख प्रवेशद्वारांना तसेच सभागृहाला महापुरुषांची नावे देण्याची मागणी करण्यात आली आहे. यासंदर्भात संघटनेने मुख्याधिकारी, नगर परिषद अकोट यांना निवेदन सादर केले. निवेदनात नगर परिषदेच्या मुख्य प्रवेशद्वाराला छत्रपती शिवाजी महाराज, दुसऱ्या प्रमुख प्रवेशद्वाराला क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांचे नाव देण्यात यावे, तसेच नगर परिषदेच्या सभागृहाला भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृह असे नामकरण करण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली आहे. महापुरुषांच्या कार्याचा सन्मान व्हावा तसेच त्यांच्या विचारांची प्रेरणा मिळावी, या उद्देशाने ही मागणी करण्यात आल्याचे नमूद करण्यात आले आहे.

# सेंट पॉल्स अकॅडमीत श्रीकृष्ण जन्माष्टमी उत्साहात साजरी

वि. प्रतिनिधी ६ सप्टेंबर



**अकोट :** स्थानिक श्रीजी कॉलनी येथील सेंट पॉल्स अकॅडमीमध्ये ४ सप्टेंबर रोजी श्रीकृष्ण जन्माष्टमीचा उत्सव भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या आकर्षक सादरीकरणांनी आणि राधा-कृष्णाच्या वेशभूषेने कार्यक्रमाला विशेष रंगत आली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष नवनित लखोटिया होते. उपाध्यक्ष लुणकरण डागा, सचिव प्रमोद चांडक, रेखा चांडक, शारदा लखोटिया, सुधा डागा, दीपम लखोटिया, अवनी लखोटिया, पालक प्रतिनिधी स्नेहल गीते व दीप्ती पुंडकर तसेच शाळेचे मुख्याध्यापक विजय बिहाडे, उपमुख्याध्यापिका ममता श्रावगी, रिंकू अग्रवाल, नितीन गावंडे, मालती महल्ले, सुचिता गायकवाड, वैशाली गावत्रे आणि प्रभुदास नाथे उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात श्रीकृष्ण मूर्ती व प्रतिमेच्या पूजनाने झाली. त्यानंतर मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. केजी-२च्या विद्यार्थिनींनी सादर केलेल्या स्वागत गीताने कार्यक्रमाची रंगत वाढवली. या सादरीकरणाला अर्चना रायबोले आणि योगेश चेडे यांनी साथ दिली.

इयत्ता तिसरी व चौथीच्या विद्यार्थ्यांनी श्रीकृष्ण जन्माष्टमीवर आधारित नाटिका सादर करून उपस्थितांची मने जिंकली. नर्सरी ते केजी-२च्या विद्यार्थ्यांनी राधा आणि कृष्णाच्या वेशभूषेत आकर्षक सहभाग नोंदवला. केजी-१च्या विद्यार्थ्यांनी श्रीकृष्ण जन्मोत्सवावर आधारित नृत्य सादर केले, तर नर्सरी व केजी-२च्या विद्यार्थ्यांनी कृष्णलीलेचेसादरीकरण केले.

यावेळी मुख्याध्यापक विजय बिहाडे यांनी श्रीकृष्णांच्या जीवनचरित्राविषयी विद्यार्थ्यांना माहिती देत चिमुकल्यांच्या सादरीकरणाचे कौतुक केले. कार्यक्रमाची सांगता इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांनी पारंपरिक दहीहंडी फोडून केली. समारोपप्रसंगी प्रमोद चांडक यांनी जन्माष्टमीच्या शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शुभांगी वाकडे यांच्यासह इयत्ता तिसरीतील वल्लारी पिसे व दक्ष वाघोडे यांनी केले, तर आभार प्रदर्शन सोनू पाथरकर यांनी केले.

# भारतीय सिनेमातील महिलांसाठी मार्गदर्शक ठरलेल्या कमलाबाई कामत

महिलांना अभिनय करण्याचीही नव्हती परवानगी, या मराठमोळ्या महिलांनी घडवला इतिहास, इंडस्ट्रीतल्या पहिल्या अभिनेत्रीची गोष्ट

जेव्हा कमलाबाई गोखले ज्या नाट्यसंस्थेत काम करत होत्या, तिथे दादासाहेब फाळके यांनी त्यांच्या मालकाकडे एक धक्कादायक मागणी केली, तेव्हा त्या फक्त १३ वर्षांच्या होत्या. फाळके यांनी नुकताच भारताचा पहिला चित्रपट ' राजा हरिश्चंद्र' (१९१३) बनवला होता आणि ते त्यांच्या पुढच्या ' मोहिनी भस्मासुर' या चित्रपटावर काम करत होते .

‘१९१२-१३ मध्ये आमची (नाट्य) कंपनी नाशिकमध्ये होती. फाळके हे नाटकांचे आणि संगीताचे मोठे चाहते होते आणि ते अनेकदा आमची नाटके पाहायला येत असत. जेव्हा त्यांना कळले की आम्ही नाट्यगृह बंद करत आहोत, तेव्हा ते आमच्या घरी आले आणि त्यांनी आम्हाला विचारले की हे खरे आहे का,’ असे कमला यांनी, वयाच्या नव्वदीत बनवलेल्या ‘कमलाबाई’ (१९९२) या पुरस्कार-विजेत्या चरित्रात्मक माहितीपटात आठवून सांगितले. कमला पुढे सांगतात: ‘रामभाऊ म्हणाले की आम्ही काही महिन्यांसाठी बंद ठेवणार आहोत. फाळके म्हणाले, 'असं असेल तर, माझी एक विनंती आहे. तुमची कंपनी बंद असताना, तुम्ही या मुलीला आणि तिच्या आईला माझ्या चित्रपटात काम करू द्याल का? कमला आणि त्यांच्या आई दुर्गाबाई कामत या भारतीय चित्रपटसृष्टीतील पहिल्या महिला अभिनेत्री ठरल्या. फाळके यांनी कमला यांना मोहिनीच्या मुख्य भूमिकेत घेतले, तर दुर्गाबाईंनी पार्वतीची भूमिका साकारली. तोपर्यंत, रंगमंचावर पुरुष स्त्रियांच्या भूमिका साकारत असत, कारण अभिनय हा स्त्रियांसाठी एक सन्माननीय व्यवसाय मानला जात नव्हता. फाळके यांनी त्यांच्या दुसऱ्या चित्रपटातून ही परंपरा मोडली, तरीही चित्रपटांमध्ये स्त्रियांना संधी देण्याची प्रथा सुरू व्हायला बराच काळ लागला.

कधी विचार केला आहे का, जर पहिल्यांदा कुणी तरी पुढे सरसावलं नसतं, तर आजच्या सिनेमात स्त्रियांना आपली जागा मिळाली असती का? त्या काळात महिलांना अभिनय करण्याची परवानगी नव्हती, सिनेमात त्यांची जागा पुरुष कलाकार घेत होते. पण एका धाडसी मुलीने हा अन्याय मोडीत काढण्याचा निर्णय घेतला. वडिलांनी सोडलेलं घर, आईवर समाजाचा तुटपुंजा आधार, पण तरीही ती आईसोबत उभी राहिली. आईच्या संघर्षातून प्रेरणा घेत तिनेही अभिनयाच्या वाटेवर पाऊल ठेवलं आणि भारतीय सिनेमाच्या इतिहासात आपले नाव कोरले. हीच कहाणी आहे कमलाबाई कामत यांची भारतीय सिनेमातील पहिली बालकलाकार .

## कमलाबाई कामत यांचा आज स्मृतिदिन



कमलाबाई यांचा जन्म एका ब्राह्मण कुटुंबात झाला. त्यांची आई दुर्गाबाई कामत ह्या देखील समाजाच्या परंपरांना आव्हान देत भारतीय सिनेमात पदार्पण करणाऱ्या पहिल्या स्त्री होत्या. कमलाबाई लहान असतानाच त्यांचे वडील आनंद नानोस्कर यांनी त्यांना आणि त्यांच्या आईला सोडून दिले. दुर्गाबाईंनी एकट्याने कमलाबाईला मोठं केलं आणि दोघीही थिएटर आणि सिनेमात काम करू लागल्या. त्या काळात स्त्रियांनी अभिनय करणे म्हणजे मोठे पाप मानले जायचे. त्यामुळे आईसोबतच कमलाबाईलाही मोठ्या संघर्षातून जावे लागले. दादासाहेब फाळके यांना त्यांच्या मोहिनी भस्मासुर (१९१३) या मूकपटासाठी अभिनेत्री हवी होती. त्या काळात कोणतीही स्त्री सिनेमात काम करण्यास तयार नव्हती. पण दुर्गाबाईंनी ही संधी स्वीकारली आणि कमलाबाईलाही या चित्रपटात घेतले गेले. त्या मोहिनीच्या भूमिकेत झळकल्या आणि भारतीय सिनेमातील पहिल्या बालकलाकार ठरल्या. पण हे यश मिळवणे सोपे नव्हते.

एका प्रसंगी, गावातील काही लोक त्यांच्या घरी आले आणि त्यांच्या आईवर ओरडू लागले. ‘स्त्रियांनी सिनेमात काम करणं म्हणजे समाजाला काळिमा फासणं आहे. तुमचं जगणं आम्ही मान्य करू शकत नाही.’ असं म्हणत त्यांनी दुर्गाबाईंना समाजातून हाकलून लावण्याचा इशारा दिला. या गोंधळात घाबरून कमलाबाई आईच्या मागे लपल्या. त्यांना काहीच कळत नव्हतं. अभिनय करणे एवढा मोठा गुन्हा कसा ठरू शकतो? आईने त्यांना हळूच जवळ घेतलं आणि ठामपणे त्या लोकांना उत्तर दिलं, ‘माझ्या मुलीला मी लाजिरवाणं काही करायला शिकवलं नाही, ती जे करतेय ते अभिमानाने पाहण्यासारखं आहे.’ त्या दिवशी कमलाबाई समजल्या की समाज काहीही म्हणो, पण आपलं स्वप्न आपणच पूर्ण करायचं. त्यांनी त्यानंतर अनेक चित्रपटांमध्ये भूमिका साकारल्या. मराठी सिनेमातही त्यांनी आपला ठसा उमटवला. भक्त प्रल्हाद (१९२६) हा त्यांचा पहिला मराठी चित्रपट ठरला. त्यानंतर त्यांनी अनेक गाजलेल्या चित्रपटांमध्ये अभिनय केला. त्या केवळ पहिल्या बालकलाकार नव्हत्या, तर भारतीय सिनेमातील महिलांसाठी मार्गदर्शक ठरल्या.

कमलाबाईंच्या वैयक्तिक आयुष्याबद्दल फारशी माहिती उपलब्ध नाही, पण त्यांचे लग्न बंडोपंत कामत यांच्यासोबत झाले होते. त्या त्यांच्या आईप्रमाणेच स्वतंत्र विचारांच्या होत्या. त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य अभिनयासाठी समर्पित केले. त्यांचा प्रवास संघर्षाने भरलेला असला तरी त्यांनी आपल्या जिद्दीच्या जोरावर समाजाच्या बंधनांना झुगारले आणि आपल्या नावाचा ठसा भारतीय सिनेमाच्या इतिहासात कोरला. त्यांच्यामुळेच आज महिला सिनेमात सहज येऊ शकतात. त्या केवळ एक अभिनेत्री नव्हत्या, तर संपूर्ण भारतीय सिनेसृष्टीच्या वाटचालीतील एक महत्त्वाचा अध्याय होत्या.

सिटी न्यूज अकोला
रविवार, दि. ६ सप्टेंबर २०२६ Web. http://epaper:citynewssuperfast.com


# ‘महाराष्ट्राची सद्यस्थिती आणि आपली जबाबदारी’वर वैचारिक मंथन

प्रतिनिधी ६ सप्टेंबर

**मुर्तिजापूर** : महाराष्ट्राच्या उज्ज्वल सामाजिक, सांस्कृतिक आणि वैचारिक परंपरेला साजेसे वातावरण निर्माण करण्याची जबाबदारी आजच्या पिढीवर आहे. अन्यायाच्या विरोधात बोलण्याची संधी असताना मौन बाळगणे हेही एका अर्थाने अन्यायाला पाठबळ देण्यासारखे आहे. त्यामुळे सत्ता, संपत्ती आणि पद यापेक्षा न्याय, समता आणि बंधुत्वाची मूल्ये जपणे हीच खरी सामाजिक जबाबदारी आहे, असा विचार माजी शालेय शिक्षण मंत्री प्रा. वसंतदादा पुरके यांनी व्यक्त केला.



मुर्तीजापूरसारख्या तालुक्याच्या ठिकाणी सामाजिक आणि वैचारिक चळवळीचे कार्य सातत्याने पुढे नेण्याचा मोठा प्रयत्न होत असल्याचे कौतुक करताना, या विचारांची व्याख्याने आणि वैचारिक प्रबोधनाची अखंड परंपरा पुढेही सुरू राहावी, तसेच माजी आमदार प्रतिभाताई तिडके यांचे विचार पुढील पिढीसाठी दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शक ठरावेत, अशी भावना व्यक्त करण्यात आली.

संत गाडगे महाराज व प्रतिमा ताई तिडके यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली

‘महाराष्ट्राची सद्यस्थिती आणि आपली जबाबदारी’ या विषयावर प्रख्यात विचारवंत हनुमंतदादा पवार यांनी परखड आणि अंतर्मुख करणारे विचार मांडले. आधुनिक महाराष्ट्राच्या वाटचालीचा संदर्भ देत त्यांनी महाराष्ट्राला लाभलेल्या वैचारिक वारशाची आठवण करून दिली. महात्मा ज्योतिराव फुले, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, चिंतामणराव देशमुख यांसारख्या महान व्यक्तिमत्त्वांनी महाराष्ट्राच्या सामाजिक जडणघडणीत दिलेल्या योगदानाचा दाखला देत आजच्या परिस्थितीचे आत्मपरीक्षण करण्याचे आवाहन त्यांनी केले.

“ज्या महाराष्ट्राने देशाला संविधानाची दिशा दिली, सामाजिक समतेचा विचार दिला, शिक्षणाची ज्योत पेटवली आणि मराठी अस्मितेसाठी संघर्ष केला, त्या महाराष्ट्राच्या आजच्या परिस्थितीकडे आपण डोळसपणे पाहिले पाहिजे,” असा सूर त्यांच्या मार्गदर्शनातून उमटला.

आज सत्य बोलणाऱ्या व्यक्तीसमोर अनेक अडचणी उभ्या राहतात, अन्यायाविरुद्ध आवाज उठविणाऱ्याला अपेक्षित सामाजिक प्रतिष्ठा किंवा संरक्षण मिळेलच असे नाही, अशी खंत व्यक्त करत हनुमंतदादा पवार यांनी समाजातील सजग आणि प्रज्ञावंत नागरिकांनी मौन सोडण्याची गरज अधोरेखित केली.

“प्रज्ञावंत व्यक्ती बोलत नाहीत, हेच आजचे मोठे दुःख आहे. अन्यायाविरुद्ध बोलण्याची संधी असताना तुम्ही गप्प राहिलात, तर त्या मौनाचाही विचार केला पाहिजे,” असा मार्मिक संदेश देण्यात आला.

माजी आमदार प्रतिभाताई तिडके यांच्या सामाजिक व राजकीय कार्याचा आढावा घेत त्यांच्या समाजाभिमुख योगदानाचा गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून बोलताना प्रा. वसंतदादा पुरके यांनी जीवनमूल्यांचा आग्रह धरला. “पद येतात आणि पदे जातात; मात्र माणसाची पत आणि प्रतिष्ठा जाऊ देता कामा नये,” असे सांगत त्यांनी सार्वजनिक जीवनात प्रामाणिकपणा, नैतिकता आणि सामाजिक बांधिलकी जपण्याचे आवाहन केले. “जगा आणि जगू द्या” हे तत्त्व स्वीकारा असे म्हणाले.

निबंध स्पर्धेतील विद्यार्थ्यांचा गौरव करून प्रथम येणारे विद्यार्थ्यांना 5000 ड्युटी येणारे विद्यार्थ्यांना 3000 तृतीय येणारे विद्यार्थ्यांना 2000 व सहभागी झालेले विद्यार्थ्यांना एक हजार रुपये बक्षीस वितरण करण्यात आले

कार्यक्रमाच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या निबंध स्पर्धेत कनिष्ठ महाविद्यालय व वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.

गेल्या ५० वर्षांपासून अखंड सुरू असलेल्या व्याख्यानमालेच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि वैचारिक जडणघडणीवर सातत्याने विचारमंथन होत आहे. महाराष्ट्राची अस्मिता, इतिहास, भाषा, संस्कृती

व्याख्यानमालेच्या प्रास्ताविकात कॅप्टन सार्थ तिडके यांनी या पाच दशकांच्या वैचारिक परंपरेचा संक्षिप्त आढावा घेतला.

# सावरगावच्या सरपंचांविरुद्ध मासिकसभा न घेतल्याचा अर्ज फेटाळला

## जिल्हाधिकारी न्यायालयाचा महत्त्वपूर्ण आदेश

प्रतिनिधी ६ सप्टेंबर

**पातूर** : सावरगाव ग्रामपंचायतीच्या सरपंच बसंतीबाई राधेश्याम राठी यांनी सन २०२३-२४ मध्ये मासिकसभा घेतली नसल्याचा आरोप करीत दाखल करण्यात आलेला अर्ज जिल्हाधिकारी अकोला यांच्या न्यायालयाने फेटाळून लावला आहे.

श्री. रविंद्र जानकीराम राठोड, रा. सावरगाव यांनी महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५९ चे कलम ३६ अन्वये जिल्हाधिकारी यांच्या न्यायालयात अर्ज दाखल केला होता. या प्रकरणात सरपंच बसंतीबाई राधेश्याम राठी तसेच ग्रामपंचायत अधिकारी/सचिव यांना गैरअर्जदार करण्यात आले होते. सदर प्रकरणात मासिकसभा न घेतल्याचा आरोप करण्यात आल्यानंतर संबंधित अहवाल जिल्हाधिकारी कार्यालयाकडे सादर करण्यात आला होता. दरम्यान, सरपंच बसंतीबाई राधेश्याम राठी यांनी मासिकसभा झाल्याचे दर्शविणारे आवश्यक प्रवेश व

### सरपंचांनी मासिकसभा घेतल्याचे पुरावे सादर केल्याने अर्जदाराचा दावा ठरला निराधार

संबंधित कागदपत्रे जिल्हाधिकारी न्यायालयासमोर सादर केले. सादर करण्यात आलेल्या कागदपत्रांचा विचार करून जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी दिनांक २५ ऑगस्ट २०२६ रोजी आदेश पारित केला. आदेशातील मुद्दा क्रमांक १ नुसार अर्जदार श्री. रविंद्र जानकीराम राठोड यांचा दिनांक ७ ऑक्टोबर २०२५ रोजीचा अर्ज फेटाळण्यात आला आहे. या निर्णयामुळे सावरगावच्या सरपंचांविरुद्ध मासिकसभा न घेतल्याचा करण्यात आलेला आरोप जिल्हाधिकारी न्यायालयात टिकला नसल्याचे स्पष्ट झाले आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाने संबंधित आदेशाची प्रत गटविकास अधिकारी, पातूर यांना पाठवून आदेशाची अंमलबजावणी करून अनुपालन अहवाल सादर करण्याचे निर्देशही दिले आहेत. जिल्हाधिकारी वर्षा मीना यांच्या स्वाक्षरीने हा आदेश २५ ऑगस्ट २०२६ रोजी जारी करण्यात आला.

# बंजारा समाजाचा तीज उत्सव उत्साहात साजरा



**पातूर** : पातूर शहरात बंजारा समाज बांधवांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या तीज उत्सवाचा समारोप मोठ्या उत्साहात व आनंदी वातावरणात करण्यात आला. यानिमित्त बंजारा समाज बांधवांनी शहरातील प्रमुख मार्गांवरून भव्य मिरवणूक काढली.

मिरवणुकीत मोठ्या संख्येने समाजबांधव सहभागी झाले होते. विशेषतः महिलांनी पारंपरिक वेशभूषेत सहभागी होत तीज उत्सवातील पारंपरिक गीते व बंजारा नृत्य सादर करून वातावरणात उत्साह निर्माण केला. महिलांच्या पारंपरिक नृत्याने मिरवणुकीला विशेष आकर्षण प्राप्त झाले.बंजारा समाजाच्या पारंपरिक संस्कृती, रूढी-परंपरा आणि लोककलेचे दर्शन घडविणारा हा उत्सव उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. मिरवणुकीदरम्यान नागरिकांनीही मोठ्या उत्सुकतेने सहभाग घेतला. मिरवणूक शांततेत आणि शिस्तबद्ध पद्धतीने पार पडावी यासाठी पातूर पोलिसांकडून चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. पोलिसांच्या योग्य नियोजनामुळे तीज उत्सवाचा समारोप शांततेत पार पडला.

# कावड-पालखी मिरवणुकीमुळे अकोटमध्ये वाहतूक वळवणार

वि. प्रतिनिधी ६ सप्टेंबर

**अकोट** : अकोट शहरात ७ सप्टेंबर रोजी होणाऱ्या भव्य कावड व पालखी मिरवणुकीच्या पार्श्वभूमीवर नागरिकांच्या सुरक्षिततेसह वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी प्रशासनाने विशेष वाहतूक नियोजन केले आहे. उपविभागीय दंडाधिकारी मनोज लोणारकर यांनी मुंबई पोलीस अधिनियम १९५१ मधील कलम ३३ अन्वये आदेश जारी करून शिवाजी महाराज चौक ते अकोला नाका हा मुख्य मार्ग सकाळी ६ ते दुपारी २ वाजेपर्यंत वाहतुकीसाठी बंद ठेवण्याचे निर्देश दिले आहेत.

पोलीस निरीक्षक, अकोट शहर पोलीस ठाणे यांच्या अहवालानुसार यंदाच्या कावड-पालखी मिरवणुकीत तालुक्यातील सुमारे २४ मंडळे सहभागी होणार असून हजारो कावडधारी शिवभक्त आणि भाविकांची उपस्थिती अपेक्षित आहे. मिरवणुकीची सुरुवात अकोला नाका येथून होऊन ती शिवाजी महाराज चौकापर्यंत जाणार असल्याने या मार्गावर मोठ्या प्रमाणात गर्दी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे वाहतूक कोंडी व संभाव्य अडचणी टाळण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे.

प्रशासनाने नागरिकांसाठी पर्यायी मार्ग निश्चित केला असून बसस्थानक रोड – रेल्वे स्टेशन – स्वामी विवेकानंद स्कूल – नरसिंग झोपडीसमोरील रस्ता – अकोला नाका या मार्गाने वाहतूक वळविण्यात येणार आहे. या कालावधीत सर्व वाहनचालकांनी पर्यायी मार्गाचा वापर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

याशिवाय वाहतूक व्यवस्थापनासाठी पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांना आवश्यक सूचना देण्यात आल्या असून मिरवणूक आयोजकांनीही पोलीस प्रशासनाच्या सर्व नियमांचे पालन करून सार्वजनिक वाहतुकीस अडथळा निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी, असे आदेशात नमूद करण्यात आले आहे.

दरम्यान, कावड-पालखी सोहळ्यासाठी शहरात मोठ्या प्रमाणात तयारी सुरू असून शिवभक्तांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. मात्र वाहतूक निर्बंधांमुळे नागरिकांनी नियोजनपूर्वक प्रवास करावा, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

# सेंट पॉल्स पब्लिक स्कूलमध्ये शिक्षक दिन उत्साहात साजरा




प्रतिनिधी ६ सप्टेंबर

**अकोट** : सेंट पॉल्स पब्लिक स्कूलमध्ये डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त शिक्षक दिन साजरा करण्यात आला .या कार्यक्रमाकरिता शाळेचे अध्यक्ष नवनीत लखोटीया, लुणकरन डागा ,प्रमोद चांडक, शारदा लखोटिया ,रेखा चांडक, दीपम लखोटिया, अवनी लखोटिया, प्रा. कविता मिश्रा, अभिषेक गुजर तसेच विद्यार्थी प्रा.संकेत गरजे, विद्यार्थीनी समन्वयक निधी कुकडे व विद्यार्थीनि प्री प्रायमरी प्राचार्या वीरा ताकोते विद्यार्थी समन्वयक अद्रिक बोचे मंचावर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला मान्यवरांचे कुंमकुम तिलक करून सरस्वती माता व डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले . विद्यार्थ्यांद्वारे पुष्पगुच्छ देऊन मान्यवरांचे स्वागत करण्यात आले .वर्ग दहावी व केजी टू च्या विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या भूमिकेत येऊन शिक्षकांचा कार्यभार सांभाळला. सर्वप्रथम वर्ग दहावीच्या विद्यार्थ्यांनी सुंदर नृत्य सादर केले . विद्यार्थ्यांनी शिक्षकांसाठी विविध खेळ आयोजित केले होते या खेळांमध्ये उत्साहाने सहभागी होऊन शिक्षकांनी खेळांचा आस्वाद घेतला. शिक्षकांचा सन्मान केला.

वर्ग दहावीचा विद्यार्थी संकेत गरजे याने आपल्या भाषणातून गुरु विषयी कृतज्ञता व्यक्त केली व शाळेचे प्राचार्य बनण्याचा पहिला अनुभव तसेच त्यांची भूमिका दिसते तशी सोपी नाही हे आपल्याला समजते. त्यांचे कार्य महत्त्वाचे आहे हे सांगितले. त्यानंतर अवनी लखोटिया यांनी शाळेतील सर्व शिक्षकांना शिक्षक दिनाच्या शुभेच्छा दिल्या व विद्यार्थ्यांना एक दिवस नव्हे तर वर्षभर शिक्षक दिन साजरा करायचा असेल तर आपल्या गुरु विषयी आपल्या मनात कृतज्ञता व आदर असावा असा संदेश दिला.प्रमोद चांडक यांनी त्यांच्या शालेय जीवनातील गुरू विषयीचे महत्व व त्यांनी दिलेली शिकवण अजूनही आम्हाला उपयोगी पडत आहे असे सांगितले.

### चंडिका चौकासह मोठा महादेव संस्थानात गोविंदांनी फोडली दहीहंडी

**हिवरखेड** : येथील चंडिका चौकात मोठ्या उत्साहाने आनंदाने गोविंदा गोपालानी एकत्रित येऊन दहीहंडी फोडून गोपाळकाला हा उत्सव साजरा केला. या दहीहंडीला पाहण्यासाठी भाविक महिला पुरुषांची गर्दी जमली होती जणू काही या ठिकाणी यात्रा भरली

तसेच या चौकाच्या बाजूला मोठा महादेव संस्थान येथे सुद्धा गोविंदा पथकाने दहीहंडी फोडून आपला आनंद दिविगत केला, यासह गावात व विविध ठिकाणी दहीहंडी उत्सव साजरा करण्यात आला याच बरोबर कृष्णा अष्टमी निमित्त अनेक निवासस्थानी भंडारे पार पडले, गोविंदा गोपाला या जय घोषणेने श्रीकृष्ण मूर्तीचे विसर्जन करण्यात आले, तसेच दहीहंडी उत्साहात हिवरखेड पोलिसांचा बंदोबस्त होता.

# अकोल्यात श्रीकृष्ण जन्माष्टमीचा उत्साह शिगेला

प्रतिनिधी ६ सप्टेंबर

**अकोला** : अकोला शहरासह जिल्ह्यात शुक्रवारी श्रीकृष्ण जन्माष्टमीचा उत्साह शिगेला पोहोचला. श्रावण-भाद्रपद कृष्ण पक्षातील अष्टमी तिथीनिमित्त मध्यरात्री १२ वाजता विविध देवालयांसह घराघरांत नंदलालाचा जन्मोत्सव भक्तिभावाने साजरा करण्यात आला. दिवसभर उपवास, मंगलगीत, आकर्षक सजावट, पूजन-अर्चन आणि भजन-कीर्तनामुळे शहरातील वातावरण भक्तिमय झाले होते.

इस्कॉन अकोला यांच्या वतीने राधेनगर, सरकारी बागेजवळील मित्र समाज क्लब येथे श्रीकृष्ण जन्माष्टमी महोत्सव मोठ्या भक्तिमय वातावरणात पार पडला. सायंकाळी ५ वाजेपासून मध्यरात्री १२ वाजेपर्यंत श्रृंगार दर्शन, नृत्य-नाटिका, छप्पन भोग दर्शन आणि शंख अभिषेकासह विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

## इस्कॉनमध्ये शंखाभिषेक, छप्पन भोग व कान्हाचा मनमोहक श्रृंगार






मध्यरात्री १२ वाजता भगवान श्रीकृष्ण जन्मोत्सवानिमित्त महाआरती करण्यात आली. ‘हरे रामा, हरे कृष्ण’च्या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला. त्यानंतर भाविकांना अनुकल्प प्रसादाचे वितरण करण्यात आले.

शनिवारी इस्कॉनच्या वतीने श्री नंदोत्सव तसेच श्रील प्रभुपाद व्यासपूजेचे आयोजन करण्यात आले. सकाळी शंख अभिषेक, अल्टर उद्घाटन, श्रील प्रभुपाद कथा व आरतीनंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. या संपूर्ण धार्मिक सोहळ्याला अकोला शहरातील श्रीकृष्ण भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली.

**राधा-कृष्ण भक्तीगीतांवर भाविकांचा नृत्य**

शहरालगतच्या गंगानगर परिसरातील श्री सालासर बालाजी मंदिरात श्रीकृष्ण जन्मोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी राजस्थानातील चित्तौडगड येथील सांवरिया सेठची मनमोहक झांकी साकारण्यात आली होती. तसेच राधा-कृष्णाच्या मूर्तीला रंगीबेरंगी फुलांनी आकर्षक सजावट करण्यात आली होती.

जन्मोत्सवाच्या शुभमुहूर्तावर अकोल्यातील प्रसिद्ध भजन गायक गोपाल शर्मा हारे यांनी हिंदी, मराठी व राजस्थानी भाषेतील भक्तिगीते सादर करून भाविकांना मंत्रमुग्ध केले. ‘कीर्तन की है रात’, ‘राधिका गोरी से’, ‘नंद घर आनंद भयो’ आदी भजनांवर उपस्थित भाविकांनी ठेका धरत उत्स्फूर्त नृत्य केले.

# सरस्वती शिशु मंदिर, खंडेलवाल मराठी प्राथमिक शाळेत श्रीकृष्ण जन्मोत्सव साजरा

प्रतिनिधी ६ सप्टेंबर

**अकोला** : स्थानिक गोडबोले प्लॉट स्थित, सरस्वती शिशु मंदिर, खंडेलवाल मराठी प्राथमिक शाळा तसेच खंडेलवाल इंग्लिश शाळेमध्ये श्रीकृष्ण जन्माष्टमी सोहळा तसेच शिक्षक दिन उत्साहात झाला.



कार्यक्रमाला सामाजिक कार्यकर्त्या सौ. कविता रहेजा , सौ.अंजू अग्रवाल (खंडेलवाल ज्ञान मंदिर संचालक मंडळाच्या सदस्या), तसेच शिक्षण प्रसारक मंडळाच्या अध्यक्षा डॉ. ताराताई हातवळणे, कोषाध्यक्ष अरुण कुळकर्णी, सचिव गोपालजी खंडेलवाल तसेच शाळा समितीच्या अध्यक्षा सौ. रेखाताई खंडेलवाल व सौ . नेहा खंडेलवाल, खंडेलवाल मराठी शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. सई रानडे आणि खंडेलवाल इंग्लिश शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. धनश्री पांडे यांच्या हस्ते श्रीकृष्ण पूजा, सरस्वती पूजन तसेच डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमा पूजनाने सुरुवात करण्यात आली.कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापिका सौ. सई रानडे यांनी केले. श्रीकृष्णाच्या लीला सादर करताना विद्यार्थ्यांनी श्रीकृष्ण जन्म, कालिया मर्दन, श्रीकृष्णाची आरती तसेच सौ. रानडे मॅडम यांचे स्वरचित श्रीकृष्णाचे स्वगत हे आजच्या परिस्थितीवर मात करण्यासाठी विद्यार्थ्यांनी कसे वागावे, याचे यथार्थ सादरीकरण केले व इयत्ता ४ थी चा विद्यार्थी चि. रमण रविंद्र गोरे याने उपस्थितांची मने जिंकली. दहीहंडी गोपाळकाला उत्सव साजरा करण्यात आला.

धनश्री पांडे यांनी स्वरचित संवाद “श्रीकृष्ण व आजचा विद्यार्थी” यामध्ये श्रीकृष्णांनी सांगितलेले विचार, आजच्या काळात किती उपयुक्त आहेत यावर भाष्य केले. सौ. कविता रहेजा यांनी कार्यक्रमाचे भरभरून कौतुक करून, "परिस्थिती कशीही असली तरी आपला विश्वास व हिंमत कधीही सोडू नये" असे उद्बोधन केले. सौ. अंजू अग्रवाल यांनी मनोगतातून, "शिक्षकांचा व वरिष्ठांचा आदर करण्यासाठी" विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

डॉ. ताराताई हातवळणे यांनी विद्यार्थ्यांना ,"श्रीकृष्ण व्यक्ती नाही, एक विचार आहे आणि हा विचार आपण पुढे नेला पाहिजे" असे मार्गदर्शन केले. जन्माष्टमी निमित्त नर्सरीच्या माता पालकांसाठी “पाळणासजावट स्पर्धा”, तसेच वर्ग १ ली व २ रीच्या माता पालकांसाठी “पूजा ताट सजावट” स्पर्धा घेण्यात आली. या दोन्ही स्पर्धेमध्ये सौ. भाग्यश्री पाठक प्रथम क्रमांक, वैष्णवी डीवरे द्वितीय क्रमांक आणि पूनम सांगे प्रोत्साहन पर बक्षीस मिळविली,तसेच "पूजा ताट सजावट” मध्ये सौ. अश्विनी राठोड प्रथम क्रमांक, सौ. माधुरी सरोदे द्वितीय क्रमांक, तसेच सौ. मंजू काशीद व सौ. अश्विनी नवथळे तृतीय क्रमांक मिळवून स्पर्धा झाली. माणूस घडविणारे ‘गुरुकुलातील शिक्षण’ आजच्या काळतही किती आवश्यक आहे, याचे मार्मिक दर्शन घडविणारे नाटक वर्ग 1ली, 3री व 4 थी च्या विद्यार्थ्यांनी करून उपस्थितांना मोलाचा संदेश दिला. आभार प्रदर्शन धनश्री पांडे मॅडम यांनी केले. संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन, पाहुण्यांचा परिचय सौ. अक्षया पुंडलिक व सौ. वैदेही चिने यांनी केले. संचालक मंडळाच्या मार्गदर्शनाने तसेच पर्यवेक्षिका सौ. मंजुषा अलकरी व सांस्कृतिक कार्यक्रमाच्या पर्यवेक्षिका सौ. रुपा ठाकरे व सौ. ममता पाथरकर यांच्या तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या अथक परिश्रमाने आणि पालकांच्या सहकार्याने कार्यक्रम यशस्वी झाला.

# श्री समर्थ पब्लिक स्कूलमध्ये जन्माष्टमी व शिक्षक दिन उत्साहात

प्रतिनिधी ६ सप्टेंबर

**अकोला** : श्री समर्थ पब्लिक स्कूलमध्ये श्रीकृष्ण जन्माष्टमी आणि शिक्षक दिन उत्साह, आनंद व भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. या निमित्ताने विद्यार्थ्यांसाठी विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.



श्रीकृष्ण जन्माष्टमीनिमित्त आयोजित दहीहंडी सोहळ्यात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. श्रीकृष्ण, राधा तसेच विविध पारंपरिक वेशभूषा परिधान केलेल्या विद्यार्थ्यांनी आकर्षक नृत्य व सांस्कृतिक सादरीकरण केले. बालकृष्णाच्या वेशातील चिमुकल्यांनी आपल्या निरागस अभिनयाने व आकर्षक वेशभूषेने उपस्थितांची विशेष दाद मिळविली.

शिक्षक दिनानिमित्त विद्यार्थ्यांनी

### दहीहंडी, कृष्ण-राधेच्या वेशभूषेसह विद्यार्थ्यांचे विविध सांस्कृतिक कार्यक्रम

शिक्षकांप्रती कृतज्ञता व आदर व्यक्त केला. विद्यार्थ्यांनी शिक्षकांची भूमिका साकारत अध्यापनाचा अनुभव घेतला. या उपक्रमातून शिक्षकांचे कार्य, जबाबदाऱ्या आणि विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत त्यांचे योगदान यांची जाणीव विद्यार्थ्यांना झाली. कार्यक्रमासाठी अध्यक्ष प्रा. श्री. नितीनजी बाठे व संचालिका प्रा. जयश्री बाठे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. त्यांनी विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे कौतुक करून त्यांना प्रोत्साहन दिले. यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष प्रा. राजेश बाठे, सहसचिव प्रा. किशोर कोरपे, सदस्य प्रा. योगेश जोशी, सदस्य प्रा. किशोर रत्नपारखी, तसेच प्राचार्य डॉ. उषालता वानखेडे आणि उपप्राचार्य प्रेमेंद्र पळसपगार यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. शिक्षकवृंद, विद्यार्थी आणि पालकांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे जन्माष्टमी आणि शिक्षक दिनाचा सोहळा आनंद, उत्साह, संस्कार आणि कृतज्ञतेची अनुभूती देणारा संस्मरणीय सोहळा ठरला.

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
रविवार, दि. ६ सप्टेंबर २०२६
https://epaper.citynewssuperfast.com

# मैत्रिणीशी बोलण्याच्या कारणावरून तरुणाची हत्या

## पिंपळगावात धारदार शस्त्राने हल्ला

प्रतिनिधी ६ सप्टेंबर

**यवतमाळ :** मैत्रिणीशी मोबाईलवर बोलण्याच्या कारणावरून झालेल्या वादातून १८ वर्षीय तरुणावर धारदार शस्त्राने हल्ला करून त्याची हत्या करण्यात आल्याची धक्कादायक घटना शनिवारी पहाटे पिंपळगाव परिसरातील घडली. या प्रकरणात दोन अल्पवयीन मुले विधी संघर्षग्रस्त बालक असल्याचे समोर आले असून, त्याना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

रोहित वीरेंद्र मेश्राम (वय १८) असे मृत तरुणाचे नाव आहे. याप्रकरणी त्याच्या कुटुंबीयांनी दिलेल्या जबाबावरून लोहारा पोलिसांनी तपास सुरू केला आहे. दि. ५ सप्टेंबर रोजी पहाटेच्या सुमारास रोहितला त्याच्या मित्राने मोबाईलवरून फोन करून घराबाहेर बोलावून घेतले. रोहित घराबाहेर गेल्यानंतर काही वेळाने कुटुंबीयांना आरडाओरड ऐकू आली. त्यानंतर त्यांनी घराबाहेर पाहिले असता रोहितवर त्याच्या मित्रांकडून धारदार शस्त्राने हल्ला करण्यात येत असल्याचे दिसून आले.

**दोन विधी संघर्षग्रस्त बालकांना पोलिसांनी घेतले ताब्यात**

या हल्ल्यात रोहितच्या छातीवर आणि पोटावर गंभीर जखमा झाल्या. तो रक्ताच्या थारोळ्यात पडलेला आढळून आला. घटनेनंतर हल्लेखोर तेथून पसार झाले. कुटुंबीयांनी तातडीने पोलिसांना माहिती दिली.

दरम्यान, ३ सप्टेंबर रोजी रात्री रोहित आणि संबंधित अल्पवयीन मुलांमध्ये एका मुलीशी मोबाईलवर बोलण्याच्या कारणावरून वाद झाला होता. त्यावेळी हा वाद मध्यस्थी करून मिटविण्यात आला होता. त्यानंतर दोन दिवसांनी रोहितवर प्राणघातक हल्ला झाल्याचे पोलिसांच्या प्राथमिक तपासात समोर आले आहे.

घटनेची माहिती मिळताच उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल कोळी यांच्या मार्गदर्शनाखाली लोहारा पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरविली. ठाणेदार सपोनी रोहित चौधरी, पोलीस उपनिरीक्षक गजानन



अजमिरे, संतोष आत्राम, नकुल रोडे, रितेश मस्के, अतुल चव्हाण आणि अमोल अनेरवार यांच्या पथकाने तातडीने कारवाई करत शिवाजी गार्डन परिसरातून दोन विधी संघर्षग्रस्त बालकाला ताब्यात घेतले आहे. पुढील तपास लोहारा पोलीस करीत आहे.

# शिक्षक दिनी जुन्या पेन्शनसाठी शिक्षकांचा मूक मोर्चा



प्रतिनिधी ६ सप्टेंबर

**यवतमाळ :** शिक्षक दिनाचे औचित्य साधत १ नोव्हेंबर २००५ पूर्वी नियुक्त झालेल्या विनाअनुदानित, अंशतः अनुदानित तसेच त्यानंतर १०० टक्के अनुदानावर आलेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी आज शनिवार दि. ५ सप्टेंबर रोजी जुन्या पेन्शन योजनेसाठी मूक मोर्चा काढला.

यवतमाळ शहरातील आझाद मैदानाजवळील महात्मा फुले यांच्या पुतळ्यापासून सुरू झालेला हा मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकला. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, शालेय शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांच्या नावे जिल्हाधिकाऱ्यांना मागण्यांचे निवेदन देण्यात आले.

महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन समन्वय संघाच्या नेतृत्वाखाली काढण्यात आलेल्या या मोर्चात संबंधित शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी १९८२ ची जुनी निवृत्तीवेतन योजना लागू करण्याची मागणी केली. १ नोव्हेंबर २००५ पूर्वी नियुक्ती झालेल्या कर्मचाऱ्यांना नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेत समाविष्ट करणे अन्यायकारक असल्याचा दावा संघटनेने केला.

**२६ हजार शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन लागू करा; जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक**

शासनाच्या विविध निर्णयांमध्ये विनाअनुदानित कालावधीतील सेवा निवृत्तीवेतनासाठी ग्राह्य धरण्याची तरतूद करण्यात आली असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. तसेच २००५ पूर्वी नियुक्त झालेल्या आणि त्यानंतर १०० टक्के अनुदानावर आलेल्या कर्मचाऱ्यांना पूर्वीचेच सेवानिवृत्ती नियम लागू करण्याबाबत निर्देश असल्याचा संघटनेचा दावा आहे.

या प्रश्नावर विविध कर्मचाऱ्यांनी न्यायालयाचा दरवाजाही ठोठावला असून, प्रकरणे सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असल्याचे निवेदनात म्हटले आहे. दरम्यान, अनेक कर्मचारी सेवानिवृत्त झाले असून त्यांना अद्याप पेन्शनचा लाभ मिळालेला नाही. काही कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाल्याने त्यांच्या कुटुंबीयांवर आर्थिक संकट ओढावल्याचे संघटनेने नमूद केले. सुमारे २६ हजार पेन्शनपीडित कर्मचाऱ्यांना दिलासा देण्यासाठी शासनाने स्पष्ट आदेश काढून १९८२ ची जुनी पेन्शन योजना लागू करावी, अशी प्रमुख मागणी करण्यात आली.

# ऑनलाईनच्या अटीला अखेर ब्रेक; दिव्यांगांसाठी ऑफलाईन अर्ज प्रक्रिया सुरू!

प्रतिनिधी ६ सप्टेंबर

**यवतमाळ :** दिव्यांग ५ टक्के जि.प. सेस योजनेच्या लाभापासून गरीब व गरजू दिव्यांगांना केवळ ऑनलाईन अर्जाच्या अटीमुळे वंचित राहावे लागत असल्याचा मुद्दा लावून धरत अपंग जनता दल सामाजिक संघटनेने केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला अखेर यश आले आहे. यवतमाळ जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी कार्यालयाने दि. ४ सप्टेंबर २०२६ रोजी अधिकृत आदेश काढत सन २०२६-२७ मधील ५ टक्के दिव्यांग सेसच्या वैयक्तिक लाभाच्या योजनांसाठी ऑफलाईन अर्ज स्वीकारण्याचे निर्देश सर्व पंचायत समित्यांना दिले आहेत.

ऑनलाईन अर्ज प्रक्रियेमुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल दिव्यांग लाभार्थ्यांना सायबर कॅफे व सेवा केंद्रांवर अनावश्यक खर्च करावा लागत असल्याचा आरोप करत अपंग जनता दलाने प्रशासनाविरोधात आक्रमक भूमिका घेतली होती. जिल्हाध्यक्ष दिपक गुलाब जाधव यांच्या नेतृत्वाखाली संघटनेने सातत्याने निवेदने, पाठपुरावा आणि आंदोलनाच्या माध्यमातून हा प्रश्न प्रशासनासमोर लावून धरला.

याच मागणीसाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलनही करण्यात आले होते.

प्रशासनाकडून तातडीने ऑफलाईन अर्ज प्रक्रिया सुरू करण्याची मागणी करत, दिव्यांगांच्या हक्काच्या योजनांमध्ये तांत्रिक अडथळे निर्माण करू नयेत, अशी ठाम भूमिका संघटनेने घेतली होती.

दरम्यान, जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी कार्यालयाने जारी केलेल्या आदेशानुसार झेरॉक्स मशीन, आटाचक्की, पावर वीडर, अस्थीव्यंगासाठी ई-सायकल, मतिमंद मुलांच्या पालकांना अर्थसहाय्य तसेच कर्णबधिर मुलांच्या कॉक्लियर इम्प्लांटच्या देखभाल-दुरुस्तीसाठी अर्थसहाय्य अशा योजनांसाठी ऑफलाईन अर्ज स्वीकारले जाणार आहेत.

गटविकास अधिकाऱ्यांना ग्रामस्तरावर मोठ्या प्रमाणात प्रसिद्धी करून विहित नमुन्यात आवश्यक कागदपत्रांसह अर्ज स्वीकारण्याचे निर्देश देण्यात आले असून, पात्र अर्ज १५ ऑक्टोबर २०२६ पर्यंत समाजकल्याण विभाग, जिल्हा परिषद यवतमाळ येथे सादर करण्याचे आदेशात नमूद आहे.

# ‘जनगणनेत ओबीसींसाठी स्वतंत्र कॉलम हवाच’

## ओबीसी जनगणनेच्या मागणीसाठी दिग्रसमध्ये आंदोलन; ‘उठ ओबीसी, जागा हो’च्या घोषणांनी दिग्रस दुमदुमले

प्रतिनिधी ६ सप्टेंबर

**दिग्रस :** ‘उठ ओबीसी, जागा हो’, ‘ओबीसी एकता जिंदाबाद’, ‘जनगणनेत ओबीसी कॉलम आलाच पाहिजे’ अशा घोषणांनी शनिवारी दिग्रस शहर दुमदुमून गेले. ओबीसींची स्वतंत्र जातनिहाय जनगणना करण्यासह विविध मागण्यांसाठी राष्ट्रीय पिछडा वर्ग (ओबीसी) मोर्चाच्या वतीने तालुकास्तरीय रॅली काढण्यात आली. रॅलीनंतर दिग्रस तहसीलदारांमार्फत राष्ट्रपतींना निवेदन पाठविण्यात आले.

देशभरातील ओबीसी समाजाच्या विविध प्रश्नांकडे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी मोर्चाच्या वतीने आंदोलन सुरू करण्यात आले आहे.



या आंदोलनाचा भाग म्हणून २ सप्टेंबरपासून देशातील विविध जिल्हे आणि तालुक्यांमध्ये टप्प्याटप्प्याने धरणे आंदोलन सुरू असल्याचे आयोजकांनी सांगितले. त्याच पार्श्वभूमीवर ५ सप्टेंबर रोजी दिग्रस येथे रॅली काढण्यात आली.

२०२७च्या जनगणनेत ओबीसींची जातनिहाय स्वतंत्र नोंद करण्यात यावी, एससी आणि एसटीप्रमाणे ओबीसींसाठी स्वतंत्र कॉलम ठेवावा तसेच प्रत्येक जातीला विशिष्ट कोड देऊन जातनिहाय आकडेवारी अधिकृत आणि पारदर्शक पद्धतीने संकलित करावी, अशी प्रमुख मागणी निवेदनातून करण्यात आली.

राज्यनिहाय व्यापक मास्टर जाती निर्देशिका तयार करणे, असूचीबद्ध तसेच स्थानिक जातींच्या सत्यापनासाठी स्वतंत्र संस्थात्मक व्यवस्था उभारणे आणि जातविषयक माहिती संकलन व सत्यापनाची प्रक्रिया पारदर्शक ठेवण्याची मागणीही करण्यात आली. शेतमालाला योग्य हमीभाव देण्यात यावा, अभ्यासक्रमात भारतीय संविधानाचा समावेश करावा, आरटीई कायद्यातील कलम २३ रद्द करून शिक्षकांवरील टीईटीची सक्ती हटवावी, आरक्षणासंदर्भातील काही निर्णय रद्द करावेत, अशा मागण्यांचाही निवेदनात समावेश आहे. तसेच नीट परीक्षेतील कथित पेपरफुटीप्रकरणी कठोर कारवाई करावी, नीट, जेईई आणि टीईटीसारख्या परीक्षा ऑफलाइन पद्धतीने घ्याव्यात, शिक्षणाचे बाजारीकरण थांबवावे आणि विद्यापीठ अनुदान आयोगाचा कायदा अधिक प्रभावीपणे लागू करावा, अशी मागणी करण्यात आली.

ओबीसी समाजाची वास्तविक लोकसंख्या आणि सामाजिक-आर्थिक स्थिती स्पष्ट होण्यासाठी जातनिहाय जनगणना आवश्यक असल्याची भूमिका आंदोलकांनी मांडली. ओबीसींसाठी जनगणनेत स्वतंत्र कॉलम हा अधिकार असून तो मिळालाच पाहिजे, असा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

रॅलीनंतर तहसीलदारांमार्फत राष्ट्रपती, भारत सरकार, नवी दिल्ली यांना निवेदन पाठविण्यात आले. आंदोलनाच्या माध्यमातून ओबीसी समाजाच्या विविध मागण्यांसाठी संघर्ष अधिक तीव्र करण्याचा इशाराही आयोजकांनी दिला. रॅलीत दिग्रस शहरासह तालुक्यातील ओबीसी समाजातील नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# ३० वर्षांपासून फरार आरोपी जेरबंद

## उमरखेड डीबी पथकाची कारवाई

प्रतिनिधी ६ सप्टेंबर

**उमरखेड :** घरात घुसून कुटुंबीयांना मारहाण करून सोन्या-चांदीचे दागिने लुटल्याप्रकरणी गेल्या तब्बल ३० वर्षांपासून फरार असलेल्या आरोपीला उमरखेड पोलिसांच्या डीबी पथकाने सापळा रचून ताब्यात घेतले. न्यायालयाने आरोपीविरुद्ध स्थायी वॉरंट काढले होते. तसेच त्याला फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ८२ अन्वये फरार घोषित करण्यात आले होते.

उमरखेड शहरातील एका घरात १० मे १९९५ रोजी पहाटे सव्वातीनच्या सुमारास अज्ञात आरोपींनी प्रवेश केला होता. यावेळी घरातील महेश शशिकांत डांगे (वय १९) यांच्यासह कुटुंबीयांना मारहाण करून त्यांच्या



ताब्यातील सोन्या-चांदीचे दागिने असा त्यावेळच्या बाजारभावानुसार सुमारे १४ हजार ६५० रुपयांचा ऐवज जबरीने लुटून नेण्यात आला होता. या प्रकरणी उमरखेड पोलिस ठाण्यात गुन्हा क्रमांक ८८/१९९५ नुसार भारतीय दंड विधानाच्या कलम ३९२, ४५७ आणि ३८० अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्यातील निष्पन्न आरोपींचा शोध घेण्यास पोलिसांनी पुन्हा सुरुवात केली. डीबी पथकाचे प्रमुख पोलीस उपनिरीक्षक शरद लोहकरे व त्यांच्या पथकाने आरोपींची माहिती संकलित केली असता परेश रामा काळे (रा. कोळी, ता. हदगाव, जि. नांदेड) हा गुन्हा घडल्यापासून फरार असल्याचे समोर आले. दरम्यान, परेश काळे हा उमरखेड शहरात आल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली. त्यानंतर डीबी पथकाने सापळा रचून त्याला ताब्यात घेतले. पुढील कायदेशीर कारवाईसाठी आरोपीला संबंधित अहवालासह न्यायालयासमोर हजर करण्यात आले. ही कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात, अपर पोलीस अधीक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी गुरव कायंदेपाटील आणि उमरखेडचे पोलीस निरीक्षक शंकर पांचाळ यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. कारवाईत डीबी पथकाचे प्रमुख पोलीस उपनिरीक्षक शरद लोहकरे, सहायक फौजदार विजय पतंगे, पोलीस हवालदार प्रसनजित भवरे, अतुल तागडे, पोलीस शिपाई दिगांबर गिते, संघशील टेंबरे, विष्णू राठोड, निवृत्ती महाळनर आणि चापोका आकाश पवार सहभागी होते.

# २०२९च्या तयारीसाठी राष्ट्रवादीची मोर्चेबांधणी

## आढावा बैठकीत पक्षविस्तारावर भर; नव्या पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या

प्रतिनिधी ६ सप्टेंबर

**उमरखेड :** आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) ने उमरखेड-महागाव विधानसभा मतदारसंघात संघटनात्मक बांधणीला सुरुवात केली आहे. गावपातळीपासून पक्षाची यंत्रणा मजबूत करण्याबरोबरच नव्या कार्यकर्त्यांना संधी देऊन २०२९च्या विधानसभा निवडणुकीसाठी सक्षम कार्यकर्त्यांची फळी उभारण्याचा निर्धार महागाव येथे झालेल्या आढावा बैठकीत व्यक्त करण्यात आला.

या बैठकीत विधानसभा अध्यक्ष तथा माजी नगराध्यक्ष राजुभैय्या जयस्वाल यांनी कार्यकर्त्यांनी गावोगावी जाऊन पक्षाची विचारधारा आणि भूमिका सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवावी, असे आवाहन केले. पक्षात फूट




पडली असली तरी शरद पवार यांचे विचार सर्वसामान्यांच्या मनात कायम असल्याचा दावा त्यांनी केला. तळागाळात पक्षाची संघटना मजबूत करून घराघरात कार्यकर्ता निर्माण करण्यावर भर देण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

बैठकीच्या अध्यक्षस्थानी प्रदेश अल्पसंख्याक विभागाचे अध्यक्ष अफजल फारुकी होते. जिल्हाध्यक्ष प्राचार्य डॉ. वर्षा निकम, प्रदेश सरचिटणीस प्रदीप पाटील देवसरकर, ओबीसी विभागाचे विदर्भ अध्यक्ष भास्कर पंडागळे, मुक्तार पठाण, कृष्णा इमडे, नाना इनामदार, महागाव तालुकाध्यक्ष स्वप्नील अडकीने यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. संघटनात्मक विस्ताराचा भाग म्हणून बैठकीत विविध पदांवर नवीन नियुक्त्या करण्यात आल्या. ॲड. शेख सलीम अब्दुल मजीद सौदागर यांची राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या अल्पसंख्याक विभागाच्या जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली. गोविंद इंगोले यांची जिल्हा सामाजिक विभागाच्या अध्यक्षपदी, अहमद मुल्लाजी यांची उमरखेड शहराध्यक्षपदी, तर जुबेर पठाण यांची ढाणकी शहराध्यक्षपदी निवड करण्यात आली.

उमरखेड-महागाव मतदारसंघात पक्षाची संघटनात्मक ताकद वाढविणे, नव्या कार्यकर्त्यांना संधी देणे आणि आगामी निवडणुकांच्या दृष्टीने बूथस्तरापर्यंत पक्षाची मजबूत यंत्रणा उभारण्याबाबत बैठकीत चर्चा करण्यात आली. उमरखेड व महागाव तालुक्यातील पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दृष्टिहीन उद्योजक भावेश भाटिया यांना ‘वंदन सन्मान’

## यवतमाळमध्ये ४ ऑक्टोबरला गौरव; प्रकाश व मंदाताई आमटे यांच्या हस्ते पुरस्कार वितरण

प्रतिनिधी ६ सप्टेंबर

**यवतमाळ :** सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे महाबळेश्वर येथील उद्योजक व समाजसेवक भावेश भाटिया यांना यंदाचा अकरावा ‘वंदन सन्मान’ जाहीर झाला आहे. स्व. मोहनलाल-शांताबाई राठी चॅरिटेबल फाउंडेशनतर्फे देण्यात येणारा हा पुरस्कार ४ ऑक्टोबर रोजी यवतमाळ येथे होणाऱ्या विशेष सोहळ्यात प्रदान केला जाणार आहे. ज्येष्ठ समाजसेवक पद्मश्री डॉ. प्रकाश आमटे व पद्मश्री मंदा आमटे यांच्या हस्ते भाटिया यांचा गौरव करण्यात येणार आहे.

एक लाख रुपये रोख, शाल,



श्रीफळ, सन्मानचिन्ह आणि मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. गेल्या दहा वर्षांपासून सामाजिक क्षेत्रात अविरत योगदान देणाऱ्या व्यक्ती व संस्थांचा फाउंडेशनतर्फे ‘वंदन सन्मान’ देऊन गौरव केला जातो. निवड समितीकडून विविध सेवाकार्यांना प्रत्यक्ष भेटी देऊन उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्ती किंवा संस्थेची पुरस्कारासाठी निवड केली जाते. यंदा भावेश भाटिया यांच्या कार्याची दखल

### व्यवसायात सहभागी करून आर्थिक स्वावलंबन

- संस्थेत कार्यरत प्रत्येक व्यक्तीला व्यवसायातील भागीदार करून घेत आर्थिक स्वावलंबनाची संधी दिली जाते. दृष्टिहीन असूनही भाटिया यांनी पॅरा ऑलिम्पिकमध्ये सहभाग घेतला आहे. वक्ते, लेखक आणि शायर म्हणूनही त्यांची ओळख आहे. राठी परिवाराने आई-वडिलांच्या स्मृतीप्रित्यर्थ आणि त्यांच्या संस्कारांतून प्रेरणा घेऊन फाउंडेशनच्या माध्यमातून विविध समाजोपयोगी उपक्रम सुरू ठेवले आहेत. ‘वंदन सन्मान’मुळे यवतमाळच्या सामाजिक क्षेत्रात वेगळे स्थान निर्माण झाले असून, यंदाच्या पुरस्काराच्या घोषणेमुळे सामाजिक कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. सोहळ्यास डॉ. अविनाश सावजी यांच्यासह यापूर्वीचे ‘वंदन सन्मान’ प्राप्त सत्कारमूर्ती आणि विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

घेत त्यांची निवड करण्यात आली.

भावेश भाटिया हे जन्मतः दृष्टिहीन आहेत. प्रतिकूल परिस्थितीवर मात करून त्यांनी महाबळेश्वर येथे ‘सनराईज कँडल’ची स्थापना केली. या माध्यमातून जवळपास दहा हजार दृष्टिहीन व्यक्तींना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्याचे फाउंडेशनने म्हटले आहे. मेणबत्ती व्यवसायाच्या माध्यमातून त्यांनी देश-विदेशातील कॉर्पोरेट कंपन्यांशी जोडणी करत सामाजिक बांधिलकी जपत उद्योगाचा विस्तार केला.

दृष्टिहीनांसह विविध प्रकारच्या दिव्यांग व्यक्तींनाही रोजगाराची संधी देण्याचे काम त्यांच्या संस्थेत केले जाते. महाबळेश्वर येथील संस्थेत सध्या ७० हून अधिक दृष्टिहीन विद्यार्थी वास्तव्यास असून, ‘कमवा आणि शिका’ या तत्त्वावर मेणबत्ती निर्मितीच्या कामात सहभागी होत आहेत. विविध आकार व प्रकारांतील १५ हजारांहून अधिक सुगंधी मेणबत्त्या येथे तयार केल्या जातात. पर्यटकांसाठी ‘वॅक्स म्युझियम’चीही उभारणी करण्यात आली आहे.

# आर्णी सायकलिंग क्लबचा दहीहंडी उत्सव

## सामाजिक एकोप्याचा संदेश; ‘गोविंदा आला रे आला’च्या घोषणा

प्रतिनिधी ६ सप्टेंबर

**आर्णी :** आर्णी सायकलिंग क्लबच्या वतीने श्रीकृष्ण जन्माष्टमीनिमित्त दहीहंडी उत्सव शनिवारी (५ सप्टेंबर) सकाळी गारवा पॉईंट येथे उत्साहात साजरा करण्यात आला. क्लबच्या सदस्यांनी एकत्र येत पारंपरिक पद्धतीने दहीहंडी फोडली. ‘गोविंदा आला रे आला’च्या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला.

दहीहंडी उत्सवाच्या निमित्ताने क्लबच्या सदस्यांमध्ये उत्साहाचे वातावरण होते. युवकांनी एकजुटीने दहीहंडी फोडण्याचा प्रयत्न करत उत्सवाची रंगत वाढविली. यावेळी एकमेकांना शुभेच्छा देत सदस्यांनी उत्सवाचा आनंद घेतला.

आर्णी सायकलिंग क्लबच्या



माध्यमातून वर्षभर विविध सामाजिक, क्रीडा आणि आरोग्यविषयक उपक्रम राबविले जातात. सायकलिंगच्या माध्यमातून निरोगी जीवनशैलीचा संदेश देतानाच विविध सण-उत्सव सामूहिकरीत्या साजरे करून सामाजिक बांधिलकी जपण्याचा प्रयत्न क्लबकडून केला जातो.

यावेळी तरुणांमध्ये एकता, बंधुभाव आणि सामाजिक सलोखा वाढविण्याचा संदेश देण्यात आला. पारंपरिक संस्कृती आणि आरोग्यदायी जीवनशैलीचा संगम या उपक्रमातून घडून आला.

दहीहंडी उत्सवात क्लबचे अध्यक्ष संतोष नालममवार यांच्यासह विठ्ठल देशमुख, अमोल देशमुख, अमोल बेलगमवार, प्रवीण मुंदुलवार, संदीप ढोले, विलास वातिले, प्रकाश सरोदे, सुनील राणे, संदीप अंदुरे, हरिओम बघेल, संदीप माहुरे, विजय रावते, नंदू राऊत, राजू पाचखंडे, प्रमोद पठाडे यांच्यासह क्लबचे सदस्य मोठ्या संख्येने सहभागी झाले.

# सिटी न्यूज सुपरफास्ट अमरावती

रविवार, दि. ६ सप्टेंबर २०२६ Web. http://epaper:citynewssuperfast.com




## माजी खासदार नवनीत राणा यांचे मुंबईतील दहीहंडीला उपस्थिती



प्रतिनिधी ६ सप्टेंबर

**अमरावती :** भाजपा नेत्या माजी खा.नवनित राणा मुंबई येथील गोकुळाष्टमी व दहिहांडी उत्सव सोहळ्यात पोहचताच उपस्थित हजारो गोविंदा भक्तांनी युवक युवतींनी केला एकच जल्लोष

मुंबई येथील सायन मधिल संजय ठाकुर यांची दहिहांडी, सांताक्रुज पुर्व येथील नितेश राजहंस सिंग यांची दहिहांडी, घाटकोपर पश्चिम येथील आ.राम कदम यांची दहिहांडी, वरळी येथील संतोष पांडे यांची दहिहांडी इ. दहिहांडी उत्सवामध्ये माजी खा.नवनित राणा यांची विशेष उपस्थिती होती. दहिहांडी हा केवळ उत्सव नसून एकता, संघभावना, साहस, शिस्त आणि परस्पर सहकार्याचा संदेश देणारा महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरेचा अविभाज्य भाग आहे असे माजी खा.नवनित राणा म्हणाल्या. गोकुळाष्टमी व दहिहांडी उत्सवाच्या निमित्ताने मुंबई शहरात विविध ठिकाणी आयोजित करण्यात आलेल्या दहिहांडी उत्सवाला यंदा मोठा उत्साह पाहायला मिळाला. भाजपा नेत्या मा.खा. नवनीत राणा यांनी मुंबईतील विविध दहिहांडी उत्सवांना विशेष उपस्थिती लावत गोविंदा पथके, युवक-युवती आणि उपस्थित नागरिकांचा उत्साह द्विगुणित केला. माजी खा. नवनीत राणा उत्सवस्थळी पोहोचताच उपस्थित गोविंदा भक्तांनी व युवक-युवतींनी एकच जल्लोष करत त्यांचे उत्स्फूर्त स्वागत केले. मुंबईतील सायन येथील संजय ठाकूर यांच्या दहिहांडी उत्सवाला, सांताक्रूझ पूर्व येथील नितेश राजहंस सिंग यांच्या दहिहांडी उत्सवाला, घाटकोपर पश्चिम येथील आ. राम कदम यांच्या दहिहांडी उत्सवाला तसेच वरळी येथील संतोष पांडे यांच्या दहिहांडी उत्सवाला माजी खा. नवनीत राणा यांनी भेट देऊन गोविंदा पथकांचा उत्साह वाढविला.

## बॉल बॅडमिंटन खेळाला प्रोत्साहन देण्याची गरज-आ.खोडके

### ७० वी वरिष्ठ राज्यस्तरीय बॉल बॅडमिंटन अजिंक्यपद स्पर्धेचे उदघाटन; अभिनेते भारत गणेशपुरे यांच्या विशेष उपस्थितीने संचारला उत्साह

प्रतिनिधी ६ सप्टेंबर



**अमरावती :** खेळाडूंमध्ये प्रचंड गुणवत्ता आणि जिद्द आहे. त्यांना योग्य मार्गदर्शन, सरावाच्या सुविधा आणि स्पर्धात्मक वातावरण मिळाल्यास खेळाडू राज्यासह देशाचे नाव उज्वल करू शकतात. शासनाच्या वतीने क्रीडा क्षेत्राचा विस्तार व क्रीडा सुविधांना अधिक बळकटी देण्यासाठी प्रयत्न होत असतांना खेळाडूंना सुद्धा प्रोत्साहन देण्याची गरज आहे. बॉल बॅडमिंटनसारख्या पारंपरिक आणि कौशल्यपूर्ण खेळाला प्रोत्साहन देण्यासाठी अधिकाधिक राज्यस्तरीय व राष्ट्रीय स्पर्धांचे आयोजन अमरावतीत व्हावे, यासाठी पुढेही आवश्यक सहकार्य करण्याचा विश्वास आमदार - संजय खोडके यांनी व्यक्त केला.

दि महाराष्ट्र बॉल बॅडमिंटन असोसिएशन संलग्नित अमरावती जिल्हा बॉल बॅडमिंटन असोसिएशन व श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय, अमरावतीच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ७० वी वरिष्ठ पुरुष महाराष्ट्र राज्यस्तरीय बॉल बॅडमिंटन अजिंक्यपद स्पर्धेच्या उद्घाटना प्रसंगी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर आमदार - ओमप्रकाश उर्फ बच्चू भाऊ कडू "चला हवा येऊ द्या" फेम, प्रसिद्ध चित्रपट अभिनेते भारत गणेशपुरे यांच्या विशेष उपस्थितीने सर्वांचे लक्ष वेधले होते. तसेच तीन दिवसीय आयोजनाचे स्वागताध्यक्ष श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावतीचे कोषाध्यक्ष शिव छत्रपती पुरस्कार प्राप्त - दिलीपबाबू इंगोले , महाराष्ट्र राज्य बॉल बॅडमिंटन असोसिएशनचे सचिव - अतुल इंगळे, अमरावती महानगरपालिकेचे स्थायी समिती सभापती - अविनाश मार्डीकर, अमरावती जिल्हा बॉल बॅडमिंटन असोसिएशनचे सचिव - प्रा. डॉ. हरीश काळे व आयोजन समिती सचिव - मनिष इंगोले तसेच इत्यादी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. मान्यवरांच्या क्रीडा ज्योत प्रज्वलित करून तसेच क्रीडा ध्वजारोहण करून स्पर्धेचा शानदार शुभारंभ करण्यात आला. आपल्या उद्घाटनपर संबोधनात आमदार - संजय खोडके म्हणाले कि, अमरावती शहरातील खेळाडूंना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर आपली गुणवत्ता सिद्ध करण्यासाठी विविध क्रीडा प्रशिक्षण,सराव व स्पर्धा आयोजन सारखे उपक्रम राबविण्यास आपले सर्वोच्च प्राधान्य आहे. अलीकडच्या काळात अमरावतीमध्ये विविध खेळांच्या स्पर्धांचे आयोजन झाल्याने शहराची क्रीडा नगरी म्हणून ओळख प्राप्त झाली आहे.

## क्रीडा संकुलातील समस्यांसाठी विद्यार्थ्यांचा एल्गार

प्रतिनिधी ६ सप्टेंबर

### तहसीलदारांनी केली प्रत्यक्ष पाहणी



**चांदूरबाजार:** चांदूरबाजार येथील क्रीडा संकुलातील विविध समस्यांकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी आज शहरातील विद्यार्थ्यांनी एकत्र येत तहसील कार्यालय, पोलीस स्टेशन व नगरपरिषद प्रशासनाला निवेदन सादर केले.

क्रीडा संकुलातील मैदानाची अस्वच्छता, डंपिंग यार्ड व मटन मार्केटमुळे निर्माण होणारी दुर्गंधी, मैदानावर मोठ्या प्रमाणात कुत्र्यांचा वावर व कुत्र्यांची विष्ठा, शौचालयाची दुरावस्था तसेच जिमचे साहित्य धूळ खात पडलेले असल्याच्या समस्या विद्यार्थ्यांनी प्रशासनासमोर मांडल्या.

विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहत आपल्या मागण्या व समस्या ठामपणे मांडल्या. विद्यार्थ्यांच्या निवेदनाची दखल घेत तहसीलदार साहेबांनी स्वतः क्रीडा संकुलाला भेट देऊन मैदानाची प्रत्यक्ष पाहणी केली आणि समस्यांची माहिती घेतली. या उपक्रमाला सुमारे २०० विद्यार्थ्यांनी भरभरून प्रतिसाद दिला. यावेळी प्रतिष्ठित नागरिक प्रवीण कुमार पवार, अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष डॉ. राहुल अहिर, संदीप मानमोडे सर, श्रीकांत वानखेडे सर, धीरज थोरात सर, ललित नागपूरकर, रोहन गुल्हाने, प्रतीक कोल्हे, भूषण काळे, तुषार गतफणे तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. क्रीडा संकुल हे शहरातील खेळाडू व विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाचे ठिकाण असून, ते स्वच्छ, सुरक्षित व खेळासाठी योग्य स्थितीत ठेवण्यात यावे, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

विद्यार्थ्यांच्या एकजुटीला प्रशासनाची सकारात्मक दखल मिळाल्याने क्रीडा संकुलातील समस्या लवकरात लवकर मार्गी लागतील, अशी अपेक्षा उपस्थित विद्यार्थ्यांनी व्यक्त केली.

## डफरीन रुग्णालयात मृत्यू पावलेल्या बालकांच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत

प्रतिनिधी ६ सप्टेंबर

### माजी खासदार नवनीत राणा यांची दखल



**अमरावती:** भाजपा नेत्या माजी खासदार नवनित राणा यांनी चिखलदरा तालुक्यातील बोराळा गावात जाऊन अमरावती जिल्हा स्त्री रुग्णालय येथील झालेल्या घटनेतील मरण पावलेल्या नवजात शिशुची आई किरण गंगाराम बेठेकर यांना 2 लक्ष रुपयांचा धनादेश देऊन केली आर्थीक मदत दिली.

या घटनेत आपल्या नवजात शिशूंना गमावलेल्या कुटुंबीयांच्या दुःखात सहभागी होत नवनित राणा यांनी सात्वंन केले.

या दुःखाची भरपाई कोणतीही आर्थिक मदत करू शकत नाही; मात्र संकटाच्या काळात कुटुंबाच्या पाठीशी उभे राहणे ही आपली सामाजिक जबाबदारी असल्याचे भाजपा नेत्या माजी खासदार नवनित राणा म्हणाल्या.

जिल्हा स्त्री रुग्णालयात घडलेल्या दुर्दैवी घटनेत नवजात शिशू गमावलेल्या कुटुंबीयांच्या दुःखात सहभागी होत भाजपा नेत्या तथा माजी खासदार सौ. नवनित राणा यांनी चिखलदरा तालुक्यातील बोराळा गावात जाऊन पीडित कुटुंबाची भेट घेतली. यावेळी त्यांनी मृत नवजात शिशूची आई किरण गंगाराम बेठेकर यांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले तसेच २ लाख रुपयांचा धनादेश देत आर्थिक मदत केली. अमरावती जिल्हा स्त्री रुग्णालयात घडलेल्या या दुर्दैवी घटनेने संपूर्ण जिल्ह्यात हळहळ व्यक्त होत आहे. आपल्या नवजात बाळाला गमावण्याचे दुःख अत्यंत वेदनादायी असताना या कठीण प्रसंगी पीडित कुटुंबाच्या पाठीशी उभे राहण्याची भूमिका नवनित राणा यांनी घेतली. बोराळा गावात पोहोचल्यानंतर नवनित राणा यांनी बेठेकर कुटुंबीयांची आस्थेने भेट घेतली. यावेळी त्यांनी कुटुंबीयांशी संवाद साधत त्यांच्या दुःखात आपण सहभागी असल्याचे सांगितले.

## खासदार बळवंत वानखडे यांनी केले डोमा येथील शासकीय आदिवासी आश्रम शाळेतील मुलांसोबत भोजन



प्रतिनिधी ६ सप्टेंबर

**चिखलदरा:** डोमा येथील शासकीय आदिवासी आश्रम शाळेत गेल्या काही दिवसांपासून भूत - प्रेत यांसारख्या अफवांमुळे विद्यार्थी शाळेत येण्यास घाबरत होते. मात्र खासदार बळवंत वानखडे ( अमरावती लोकसभा ) यांनी विद्यार्थ्यांचे मनोबल वाढवण्यासाठी व त्यांच्या मनातील शंका दूर करण्यासाठी स्वतः डोमा येथील शासकीय आश्रम शाळेस भेट देऊन विद्यार्थ्यांसोबत संवाद साधला व त्यांच्यासोबत संध्याकाळचे जेवण देखील पंगतीमध्ये बसून घेतले. यावेळी संजय चौधरी (मुख्याध्यापक शासकीय माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रम शाळा डोमा) , सहदेवभाऊ बेलकर, रोहित पटेल , राहुल येवले, राजेशभाऊ सेमलकर, किशोरभैय्या झाडखंडे , विकीभाऊ राठोड , आर.आर. कान्हे ( अधीक्षक ), जयकुमार झाडखंडे व गावातील मंडळी उपस्थित होती.

## हायटेक हे केवळ रुग्णालय नसून एक कुटुंब-खासदार डॉ.अनिल बोंडे

प्रतिनिधी ६ सप्टेंबर

### रुग्णांच्या भावनांशी समरस होऊन निरंतर सेवा कार्य सुरू ठेवा; हायटेक मल्टीस्पेशालिटी रुग्णालयाचा वर्धापन दिन थाटात साजरा



**अमरावती :** "हायटेक मल्टीस्पेशालिटी रुग्णालय ही केवळ एक वैद्यकीय संस्था नसून एक जोडलेले कुटुंब आहे. रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांच्या समस्या समजून घेऊन त्यांच्या भावनांशी समरस होणे हेच आपले खरे कर्तव्य आहे. रुग्ण सेवा अधिक गतिमान करत प्रत्येकाशी आपुलकीने संवाद साधा आणि हे सेवेचे व्रत निरंतर सुरू ठेवा," असे प्रतिपादन हायटेक रुग्णालयाचे व्यवस्थापकीय संचालक (CMD) खासदार डॉ. अनिल बोंडे यांनी केले.

हायटेक मल्टीस्पेशालिटी रुग्णालयाच्या २४ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित विशेष सोहळ्यात संस्थेचे कुटुंबप्रमुख म्हणून ते बोलत होते. अत्यंत उत्साहात व थाटात पार पडलेल्या या सोहळ्यात डॉ. बोंडे यांनी रुग्णालयाची आतापर्यंतची प्रगती, भविष्यातील वाटचाल आणि वैद्यकीय क्षेत्रातील दिवसेंदिवस वाढती गतिमानता यावर कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन केले.

रुग्णालय चालवताना सर्व विभागांमध्ये योग्य समन्वय असणे अत्यंत गरजेचे आहे. उपचारासोबतच रुग्णाच्या नातेवाईकांचे योग्य समुपदेशन केल्यास त्यांचा विश्वास द्विगुणीत होतो. रुग्णालयात येणारा प्रत्येक रुग्ण चिंतेत असतो. अशा वेळी डॉक्टर आणि कर्मचाऱ्यांनी त्यांच्याशी प्रेमाने आणि आपुलकीने संवाद साधून त्यांचे मनोबल वाढवले पाहिजे, रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना येणाऱ्या अडचणी ओळखून त्यांची तातडीने पूर्तता करणे हीच हायटेकची खरी ओळख राहिली आहे, असे डॉ.अनिल बोंडे यांनी आवर्जून नमूद केले. या वर्धापन दिन सोहळ्याला महापालिकेच्या स्थायी समितीचे माजी सभापती तुषार भारतीय, संस्थेच्या संचालक डॉ. वसुधा बोंडे, डॉ. दिनेश वाघाडे, डॉ. अभिजित देशमुख, डॉ. जयंत डेहनकर मनाली बोंडे, डॉ. रोहिणी यादगिरे, शुभम बायस्कार, प्रभाकर गायकवाड, अनिल मानकर, किशोर लाडेकर यांच्यासह रुग्णालयातील सर्व डॉक्टर, अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दरम्यान वर्धापन दिनानिमित्त उत्कृष्ट सेवा देणाऱ्या कर्मचाऱ्यांचा गौरव करण्यात आला असून, हायटेक परिवाराने भविष्यातही आरोग्य क्षेत्रात नवनवीन टप्पे गाठण्याचा संकल्प केला.

## सामाजिक बांधिलकीचा आज दहीहंडी सोहळा



प्रतिनिधी ६ सप्टेंबर

**अमरावती :** यावर्षी जिल्हा स्त्री रुग्णालयातील दुर्दैवी घटनेच्या पार्श्वभूमीवर विदर्भस्तरीय दहीहंडी उत्सव साध्या पद्धतीने, कोणताही गाजावाजा न करता सामाजिक बांधिलकी व मानवतेची सेवा या भावनेतून आयोजित करण्यात येत आहे.

६ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता, नवाथे चौक, अमरावती येथे भगवान श्रीकृष्ण पूजन करून दहीहंडीची परंपरा कायम ठेवण्यात येणार आहे. यावेळी दुर्घटनेत मृत्यू झालेल्या बालकांना श्रद्धांजली अर्पण करून पीडित व गरजू कुटुंबांना आर्थिक मदत करण्यात येणार आहे. तसेच दुर्घटनेच्या प्रसंगी स्वतःच्या जीवाची पर्वा न करता बालकांचे प्राण वाचविण्यासाठी तत्परतेने कार्य करणाऱ्या आरोग्य विभागातील अधिकारी-कर्मचारी, तसेच ज्या खासगी रुग्णालयातील डॉक्टर व वैद्यकीय कर्मचाऱ्यांनी विनामूल्य उपचार व वैद्यकीय सेवा उपलब्ध करून दिली, त्यांचा विशेष सन्मान करण्यात येणार आहे. संत-महात्म्यांच्या उपस्थितीत राधा-कृष्णाची वेशभूषा परिधान करून सहभागी होणाऱ्या बाळगोपाळांच्या हस्ते दहीहंडी फोडण्याचा विशेष कार्यक्रमही आयोजित करण्यात आला आहे.

## राष्ट्रीय स्पेशल ऑलिम्पिक पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत गोविंद विरुळकर यांचे सुवर्णयश

प्रतिनिधी ६ सप्टेंबर



**अमरावती :** गाझीपूर, उत्तर प्रदेश येथे १ व २ सप्टेंबर रोजी आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्रीय स्पेशल ऑलिम्पिक पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत अमरावती जिल्ह्याचे तसेच प्रसन्ना जिम व्यायामशाळेचे खेळाडू गोविंद विरूळकर यांनी उत्कृष्ट कामगिरी करत सुवर्णपदक पटकावले. त्यांच्या या ऐतिहासिक कामगिरीमुळे अमरावती जिल्ह्याच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

गोविंद विरूळकर यांच्या या यशामागे त्यांचे प्रशिक्षक अमित दुर्गे सर यांचे मोलाचे मार्गदर्शन, सातत्यपूर्ण सराव आणि मेहनत यांचा मोठा वाटा आहे. प्रतिकूल परिस्थितीवर मात करत गोविंद यांनी राष्ट्रीय स्तरावर मिळविलेले हे यश इतर गतिमंद खेळाडूंसाठी निश्चितच प्रेरणादायी आहे.

अमरावती जिल्ह्यातील गतिमंद व दिव्यांग शालेय तसेच विद्यापीठातील मुला-मुलींनी पॉवरलिफ्टिंग, वेटलिफ्टिंग, बॉडी बिल्डिंग आणि आर्म रेसलिंग या क्रीडा क्षेत्रात मोठ्या संख्येने पुढे यावे, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर यश संपादन करावे आणि अमरावती जिल्ह्याचे तसेच प्रसन्ना जिम, गोपाल युवक व्यायामशाळेचे नाव उज्वल करावे, अशी अपेक्षा यावेळी व्यक्त करण्यात आली.

गोविंद विरूळकर यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल प्रसन्ना जिमचे संचालक तथा माजी सभागृह नेता सुनील काळे सर, सचिन रौंदळकर , रविकांत काकडे , मनीष हिरोडे , मारुती भोयर , मंगेश परिमल , अजय ठाकरे , गोपाल अडगोकार , तसेच अमरावती जिल्हा पॉवरलिफ्टिंग असोसिएशनचे सचिव अंकुश एलगुंदे आणि अमरावती जिल्ह्यातील सर्व पॉवरलिफ्टर खेळाडूंनी गोविंद यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील क्रीडा वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.

गोविंद विरूळकर यांच्या सुवर्णपदकामुळे गतिमंद खेळाडूंमध्येही अफाट क्रीडा गुणवत्ता असून योग्य मार्गदर्शन, प्रशिक्षण व संधी मिळाल्यास ते राष्ट्रीय स्तरावर चमकदार कामगिरी करू शकतात, हे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे.

## अमरावती ग्रामीण पोलीस दलाची अवैध दारु व जुगार वर धडक कारवाई

प्रतिनिधी ६ सप्टेंबर



**अमरावती:** अमरावती ग्रामीण पोलीस दलाची अवैध दारू व जुगार वर धडक कारवाई केली आहे. पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांनी अमरावती ग्रामीण जिल्हयात ऑपरेशन कवच या संकल्पनेखाली अमरावती ग्रामीण घटकातील सर्व ठाणेदार व स्थानिक गुन्हे शाखा, अमरावती ग्रामीण यांना अवैध दारू व जुगार धंदे यावर कार्यवाही करणेबाबत निर्देशित केले आहे. त्यानुसार दिनांक ०४/०९/२०२६ रोजी स्थानिक गुन्हें शाखा, अमरावती ग्रा. व विविध पोलीस स्टेशन मोर्शी, चांदुर रेल्वे परिसर व पोलीस स्टेशन खोलापुर, धारणी, चांदुर रेल्वे व तिवसा येथे जुगार व पोलीस स्टेशन दत्तापूर, चांदुर रेल्वे, मोर्शी, माहुली जहागीर येथे अवैध दारू धंद्यावर कार्यवाही करण्यात आली असून ती खालीलप्रमाणे.

पो.स्टे. खोलापूर, धारणी, तिवसा, चांदुर रेल्वे व पथ्रोट येथे जुगार अडयांवर कारवाई-

विविध पोलीस स्टेशन चे जुगार कार्यवाही दरम्यान एकूण १६ इसमांविरूध्द कारवाई करण्यात आली असून त्यांचे ताब्यातून जुगार वरली मटका साहीत्य व नगदी असे मिळून एकूण २,४९,९८५/- रू चा मुद्येमाल जप्त करण्यात आला.

पो.स्टे.दत्तापूर येथे अवैध दारू धंद्यांवर कारवाई-

नमुद पोलीस स्टेशनला अवैध दारू बाबत कारवाई केली असता आरोपी नामे आशिश मुरलीधरराव गुजर, वय २७ वर्ष, कारवाई केली असता त्यांचे ताब्यातून आय कॉनिक १८० मिली २ कॉटर, मास्टर डेटाईट १८० मिली ६ नग, आर. एस ३ कॉटर असा एकूण ११ नग किंमत अंदाजे २११०/- रू चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

पो.स्टे. मोर्शी येथे अवैध दारू धंद्यांवर कारवाई आरोपी जितेन्द्र जोगसिंग टाक, रा. पाळा ता. मोर्शी यांचेवर कारवाई केली असता त्यांचे ताब्यातून १८ नग बॉटल किंमत अंदाजे ७२०/- रू असा मुद्येमाल मिळून आला

, पो.स्टे. माहुली जहागीर येथे अवैध दारू धंद्यांवर कारवाई-

आरोपी किसनराव बळवंतराव चौधरी, वय ६५ वर्ष, रा. जिरी पुरा माहुली, ता. जि. अमरावती यांचे ताब्यातून १० नग संत्रा देशी दारू पावटया किं.अं. ५००/- रू चा मुद्येमाल मिळून आला. सदरची कारवाई पोलीस अधीक्षक निकेतन कदम (भापोसे), यांच्या आदेशाने अपर पोलीस अधीक्षक दत्ता तोटेवाड यांचे मार्गदर्शनात ठाणेदार खोलापूर, मोर्शी, माहुली, धारणी, तिवसा, चांदुर रेल्वे व पथ्रोट यांनी केली आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम

रविवार दि. ६ सप्टेंबर २०२६ http://epaper.citynewssuperfast.com





# लाचलुचपतच्या भ्रष्टाचारात अन् कारवायात... वाशीम जिल्हा 'नंबर १'!

• सिटी न्युज ब्युरो @ वाशीम •

नागरीकांना आपल्या कामासाठी शासकीय कार्यालयाचे उंबरठे झिजवावे लागतात. लक्ष्मीदर्शन झाल्याशिवाय सामान्य नागरीकांचे कामे होत नसल्याचे लाच लुचपत प्रतिबंधक विभागाने केलेल्या कारवाईच्या आकडेवारीवरुन दिसून येते. सन २०२३ ते २६ आतापर्यंत या ३३ गुन्हे दाखल झाल्याची नोंद आहे. वाशीम जिल्ह्यातील शासकीय कार्यालयात भ्रष्टाचाराचे प्रमाण वाढले असून आतापर्यंत लाच घेताना ४६ जणांना गिरफ्तार केले असून या घरकुलासाठी महसुल कार्यालयातील पोलिस विभागातील अनेक जण लाच घेतांना जाळ्यात अटकले आहेत. वाशीम लचलुचपत विभागाची राज्यात कारवाया मस्त असून मागील वर्षी पेक्षा जास्त आहेत. आता मात्र जिल्ह्यातील अधिकारी भ्रष्टाचाराचे कार्ड बनले असून त्यांनी आतापर्यंतचे भ्रष्टाचाराचे सर्व रेकॉर्ड मोडले आहेत. आता पर्यंत दरवर्षी भ्रष्टाचारात व कारवायात वाढत होत असून जिल्हा भ्रष्टाचारात व कारवायात १ नंबर बनला आहे. हे यावरून सिध्द होते. अधिकारी लाखोचा पगार असून पैशासाठी लाचार झाले आहेत.

## * कारवाया मस्त *गेल्या वर्षी पेक्षा दरवर्षी जास्त * रेकॉर्डचा बनला दस्त....

### जिल्हा विकासात नव्हे, तर भ्रष्टाचारात पुढे...

देशाचा विकास होत असतांना वाशीम जिल्हा मात्र अद्यापही विकासापासून कोसोदूर आहे. मात्र भ्रष्टाचाराने पोखरून वाळवी लागलेल्या भ्रष्टाधिकाऱ्यांमुळे खऱ्या योजना लाभार्थ्यांपर्यंत पोहोचल्याच नाही. विकासात नव्हे तर भ्रष्टाचारात वाशीम जिल्हा पुढे गेला असल्याचे एसीबीच्या कारवाया वरून सिध्द झाले आहे.

### प्रत्येक कार्यालयात भ्रष्टाचार, अधिकारी लाचार...

लाखो रूपयाचा पगार असून सर्वसामान्यांना थोडक्या पैशाची कामासाठी लाच मागणारा अधिकारी पैशासाठी लाचार झाला आहे. भ्रष्टाचार वाढल्यामुळे लाचलुचपत विभागाकडे तक्रारी वाढल्या असून कारवायाही वाढल्या आहेत. त्यामुळे जिल्ह्यातील अधिकारी लाचलुचपतच्या जाळ्यात अटक आहेत.

### नागरिकांनी नि:संकोचपणे तक्रार करावी - परदेशी

नागरिकांच्या तक्रारीमुळेच अन् हिमंतीमुळे लाचलुचपत विभागाच्या कारवायामध्ये वाढ झाली आहे. त्यामुळे सामान्य नागरिकांना त्यांच्या हक्काच्या कामासाठी जर एखाद्या शासकीय कार्यालयात नागरिकांकडून लाचेची मागणी केली जात असेल तर नि:संकोचपने आमच्याशी संपर्क साधावा असे पोलीस उप अधीक्षक ला.प्र.वि. जगदिश परदेशी यांनी आवाहन केले आहे.

### भ्रष्टाचाराच्या विरोधात सतत 'सिटी न्युज सुपरफास्ट'ची वृत्त मालिका

भ्रष्टाचाराच्या विरोधात विविध विभागातील हजारो बातम्याची वृत्त मालिका सिटी न्युज सुपरफास्ट लावून धरत असल्यामुळे वाचकांमध्ये लोकप्रिय झाले आहे. जिल्ह्यातील सर्वच विभागातील भ्रष्टाचारांच्या पुराव्यासहीत बातम्याची सिटी न्युज सुपरफास्टने वृत्त मालिका लावून धरल्या आहेत.

जिल्हा निर्मितीच्या २८ वर्षानंतरही राजकीय दुरदृष्टीचा अभाव अन् जिल्ह्याला मिळालेल्या भ्रष्टधिकाऱ्यांमुळेच जिल्हा आजही विकासापासून कोसोदूर आहे. विकासात नव्हे तर भ्रष्टाचारात जिल्हा नंबर १ झाला आहे. भ्रष्टाचाराच्या कारवायाचेही सर्व रेकॉर्ड मोडले आहेत. भ्रष्टअधिकाऱ्यांमुळे शासकीय योजना खऱ्या लाभार्थ्यांपर्यंत पोहोचल्याच नाहीत. शासकीय कार्यालयात लोकशाही नांदत नसून अधिकारीशाही नांदत आहे. जिल्ह्यातील कोणत्याही शासकीय कार्यालयात गेला अन् सहजासहजी काम झाले असे दिसणारच नाही. त्रास न होता काम झालेली व्यक्ती दाखवा अन् बक्षीस मिळवा असे म्हणण्याची वेळ आली आहे. शहरी भाग असो वा ग्रामीण सर्वत्रच लाचखोरीचे प्रमाण दिसून येते. दरमहिन्यात लाचखोरीच्या घटना घडत आहेत. व गुन्हेही दाखल होत आहेत.




शेतकरी, सामान्य नागरीकांशी निगडीत असलेल्या व वारंवार काम पडणाऱ्या पोलिस प्रशासन ,महसुल विभाग, जिल्हा परिषद, विद्युत वितरण विभाग, महानगर पालीका, नगर परिषदा, पंचायत समिती, वन विभाग, आरोग्य विभाग, शिक्षण विभाग अशा बहुतांश सर्वच शासकीय कार्यालयात कारवाया झालेल्या दिसून येतात. प्रगतीच्या बाबतीत पुढे असलेल्या असलेल्या मोठया व प्रगत जिल्हे आणि विभाग देखील लाचखोरीपासून दूर नाहीत. लाचखोरी रोखण्यासाठी जिल्ह्यातील लाचलुचपत विभागाने पुढाकार घेतला आहे. दरवर्षी जिल्ह्यात भ्रष्टाचारात व कारवायात वाढच होत आहे. मात्र लाचलुचपत विभागाच्या कारवाईने जिल्ह्यातील भ्रष्टकारभाराची लफत्तरे वेशीवर लटकले आहेत. त्यामुळे जिल्हा भ्रष्टाचारात देशात व राज्यात १ नंबर झाला आहे. भ्रष्टाचार रोखण्यासाठी ठोस कारवाईची गरज असल्याची मागणी नागरीकांमधून होत आहे.

## थोडक्यात

### उमरी खुर्दमध्ये भक्तीचा जागर

*मंत्री ना. संजय राठोड यांच्या प्रमुख उपस्थितीत धार्मिक सोहळा
*संत जेतालाल महाराज, सामकी माता यांचे दर्शन; हजारो भाविकांनी घेतला महाप्रसाद



• सिटी न्युज ब्युरो @ वाशीम •

बंजारा समाजाचे श्रद्धास्थान असलेल्या उमरी खुर्द येथे श्रीकृष्ण जन्माष्टमीनिमित्त भक्तिमय वातावरणात विविध धार्मिक कार्यक्रम पार पडले.

आज ५ सप्टेंबर रोजी मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी उमरी खुर्द येथे उपस्थित राहून संत जेतालाल महाराज, सामकी माता आदी देवी-देवतांचे दर्शन घेतले. यावेळी त्यांनी समाज बांधवांशी संवाद सुध्दा साधला. उमरी खुर्द येथील संत जेतालाल महाराज मंदिर संस्थानमध्ये गोकुळाष्टमीनिमित्त दरवर्षी श्रावण महिन्यात भजन संध्येसह विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. गोकुळाष्टमीच्या दिवशी भगवान श्रीकृष्णाच्या चरणी सुख, समृद्धी आणि नवचैतन्य नांदावे, अशी प्रार्थना करण्यात येते. यावर्षीचा हा भक्तिमय सोहळा धर्मगुरू यशवंत महाराज यांच्या हस्ते श्रीकृष्ण जन्मोत्सव साजरा करण्यात आला. त्यानंतर गोपाळकाला आणि दहीहंडीचा कार्यक्रम उत्साहात झाला. यावेळी मंत्री संजय राठोड तसेच खासदार संजय देशमुख यांनीही देवी-देवतांचे दर्शन घेतले. मंदिर संस्थानच्या वतीने महंत धर्मगुरू यशवंत महाराज आणि महंत अभिमान महाराज यांनी मंत्री श्री. राठोड व खासदार श्री. देशमुख यांचा शाल व फेटा बांधून सत्कार केला. धर्मगुरू यशवंत महाराज यांच्या अरदासने आणि भोग-भंडाऱ्याने धार्मिक सोहळ्याची सांगता झाली. परिसरातील हजारो भाविक आणि समाज बांधवांनी या सोहळ्यास उपस्थिती लावून भोग-भंडारा व महाप्रसादाचा लाभ घेतला. दरम्यान प्रमुख मार्गाने मिरवणूक काढण्यात आली होती.

## भर रस्त्यावर गाडी अडवून लुटमार करणारी टोळी गजाआड !

• सिटी न्युज ब्युरो @ कारंजा •

दिवसेंदिवस गुन्हेगारी वाढत असून गुन्हेगाराची गुन्हे करण्याची हिम्मत सुद्धा वाढत आहे. एखाद्या व्यक्तीची गाडी भर रस्त्यावरून अडवून त्याला मारहाण करून त्याची लूटमार करणे ही मोठी धक्कादायक गोष्ट आहे. अशा या बदलत्या गुन्हेगारी समोर सर्वसामान्य माणूस सुरक्षित आहे का ?असा सवाल यावेळी उपस्थित होतो. आणि या बदलत्या व वाढत्या गुन्हेगारीला व गुन्हेगाराला संपवण्यासाठी पोलीस यंत्रणेला कठोर पाऊल उचलावे लागेल. अशीच घटना कारंजा मंगरूळपीर रोड वर कारंजा शहर लगत घाडली.

सविस्तर माहिती अशी की पो.स्टे. कारंजा शहर येथे दि.२४ ऑगस्ट रोजी फिर्यादी लखन सुनिल टाले वय १९ वर्ष रा.शेलुवाडा यांनी जबानी रिपोर्ट दिला की, तो व त्याचा मित्र हरीओम पंजाब म्हस्के असे शेलुवाडा कडुन कारंजा कडे येत असतांना कीर्ती गोल्ड सोयाबीन कंपनि कारंजा लाड च्या जवळ एका लाल रंगाचे चार चाकी गाडी त्यांचे समोर येवुन थांबली व त्या मधील इसमांनी त्याला बॉटल व प्लॅस्टीक पाईप ने मारहाण केली व फिर्यादीचे खिशातील रेड मी कंपनिचा मोबाईल कीं.१५ हजार रुपये व त्यांची हीरो कंपनिची स्प्लेंडर मो.सा.क्र.एमएच ३७ ए.एल.७८९७ कीमत अंदाजे ३५ हजार रुपये जबरीने चोरुन घेवुन गेले अशा फिर्यादीचे जबानी रिपोर्ट वरुन पोस्टे कारंजा शहर अप नं.५४८/२०२६



कलम ३०९(६), ३(५)भा.न्या.संहीता २०२३ प्रमाणे दाखल करुन तपासात घेतला. घडलेल्या गुन्ह्याचे गांभिर्य पाहता पोलीस अधिक्षक वाशिम निकेश खाटमोडे पाटील यांनी गुन्हा उघडकीस आणुन गुन्ह्यात चोरी गेलेला मुद्देमाल तसेच आरोपी यांचा शोध घेवुन तात्काळ अटक करणे कामी पोलीस निरिक्षक अमर चोरे पोस्टे कारंजा शहर यांना आदेशीत केले त्या अनुशंघाने तपास पथक चे अधिकारी व अंमलदार यांना आरोपी शोध कामी रवाना केले असता तपास पथक यांनी आरोपीचा शोध घेणे करिता कारंजा शहर व वेगवेगळ्या ठीकाणावरचे ५० हुन अधिक सि.सी.टी.व्ही. फुटेज ची तपासणी करुन तांत्रीक व गुप्त बातमी व्दारे आरोपी निष्पन्न;करण्याचा प्रयत्न केला असता, तपास पथकाला तांत्रीक विश्लेशना व्दारे व गुप्त बातमीदारामार्फत माहीती मिळाली की, १)शिवकुमार सुरेश जगताप वय २३ वर्ष रा.सायखेडा ता.दारवहा जि.यवतमाळ २) आकाश गजानन कचरे वय २५ वर्ष रा.ब्राह्मणवाडा ता.आर्णी जि.यवतमाळ ३) मोहणराज ओमप्रकाश पेटेवार वय २८ वर्ष रा. विद्याभवन वार्ड घाटंजी ता. घांटजी जि.यवतमाळ ४) ऋषीकेश सतीषराव काळे वय २६ वर्ष रा. बोधड ता.आर्वी जि. वर्धा यांनी सदर चा गुन्हा केला आहे. त्यामुळे त्यांना मोठ्या शिताफीने ताब्यात घेवुन सखोव विचारपुस केली असता त्यांनी सदर गुन्ह्याची कबुली दिल्याने त्यांचे ताब्यातुन सदर गुन्ह्यातील वरुन व मो.सा.कीं. अंदाजे ५० हजार रुपये व गुन्हा करते वेळी वापरलेली चारचाकी गाडी रेनॉल्ड क्विड क्र.एम एच २९ ए आर १६७७ असा माल जप्त करण्यात आला. सदर ची कार्यवाही पोलीस अधिक्षक निकेश खाटमोडे पाटील, पो.अधिक्षक कार्या अप्पर पोलीस अधिक्षक लता फड मॅडम, उपविभागीय पोलीस अधिकारी मनिष ठाकरे यांचे मार्गदर्शनात पोलीस निरिक्षक अमर चोरे, पोऊपनि विशाल बोरकर, पोहवा गणेश जाधव, पोहवा मयुरेश तिवारी, पोहेकॉ अजय धनकर, पोकॉ मोहम्मद परसुवाले, पोकॉ नितीन पाटील, पोकॉ अनिस निमसुरवाले, पोकॉ अमित भगत, यांचा सहभाग असुन पुढील तपास पोउपनि विशाल बोरकर हे करित आहे.

## ट्रान्सफॉर्मर जळाले, सिंचनाचे काम थांबले!

### *विद्युत पुरवठा अधिक्षक अभियंता यांनी लक्ष देण्याची गरज *खंडित वीजपुरवठ्याने चिखली शेतशिवारातील शेतकरी हैराण

• दिपक मापारी @ कवठा •

तालुक्यातील येणाऱ्या चिखली गावातील शेतकऱ्यांना वीज ट्रान्सफॉर्मरमुळे सिंचन करता येत नाही. २० दिवसांपूर्वी शेतातील ट्रान्सफॉर्मर जळाल्याचे सांगण्यात आले, त्यामुळे त्याला जोडलेल्या शेतकऱ्यांचे पाण्याचे पंप पूर्णपणे बंद पडले आहेत. परिणामी, शेतातील सिंचन थांबले आहे. सोयाबीन पीक वाळण्याच्या अवस्थेत. अनेक ठिकाणी सोयाबीन कापून गेलेली आहे. त्यामुळे पिकांना सतत पाण्याची आवश्यकता आहे. परंतु ट्रान्सफॉर्मर जळाल्याने शेतकरी सिंचनाची चिंता करत आहेत.



शेतकऱ्यांच्या तक्रारीवरून महावितरणचे कर्मचारी घटनास्थळी पोहोचले. त्यांनी ट्रान्सफॉर्मरची पाहणी केली आणि सांगितले की डीपी पूर्णपणे विघडला आहे. परंतु असे असूनही, येथे नवीन ट्रान्सफॉर्मर बसवण्यात आलेला नाही किंवा पर्यायी व्यवस्था करण्यात आलेली नाही. जर पाणी उपलब्ध नसेल


नादुरुस्त रोहित्राने सोयाबीन पीक धोक्यात !

तर पिके सुकतील शेतकऱ्याचे म्हणणे आहे की ते पूर्णपणे पावसावर अवलंबून राहू शकत नाहीत. शेतात ओलावा टिकवून ठेवण्यासाठी दर दोन ते तीन दिवसांनी पाण्याची पाळी सिंचन करणे आवश्यक आहे. आता वीजखंड खंड असल्याने पंप काम करत नाहीत आणि शेतातील माती सुकू लागली आहे. शेतकऱ्यांनी महावितरणकडे ट्रान्सफॉर्मर लवकर बदलून वीजपुरवठा पुन्हा सुरू करण्याची मागणी केली आहे. अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार गंभीरपणे लक्ष दिले आहे आणि विशेष शेतकऱ्यांनी व्यक्त केला आहे, परंतु जर समस्या लवकर सोडवली गेली नाही तर त्यांना आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागेल असा इशाराही देण्यात आला आहे.

शेतात सोयाबीन सुकुन चाललेली आहे. अशा परिस्थितीत सोयाबीन पिकांना पाणी नसल्यामुळे त्यांची वाढ थांबू लागली असून, आणि भविष्यात संपूर्ण पीक खराब होऊ शकते.

## ग्रामरोजगार सहाय्यक मारहाण प्रकरण...

## मारहाण झाली, कारवाई कुठे गेली; अटकेसाठी संघटना पेटली !

### ११ सप्टेंबरपासून संघटनेचा कामबंदचा इशारा; अरविंद सोनवणे सपत्नीक उपोषणाला बसणार




• सिटी न्युज ब्युरो @ वाशीम •

मानोरा पंचायत समितीत ग्राम रोजगार सहाय्यकावर कथित मारहाण, शिवीगाळ व जिवे मारण्याची धमकी देण्याची घटना घडूनही अद्याप आरोपींवर ठोस कारवाई न झाल्याने वाशिम जिल्हा ग्राम रोजगार सहाय्यक संघटना संतप्त झाली आहे. संबंधित आरोपींना तात्काळ अटक करून कठोर कायदेशीर कारवाई करावी, या मागणीसाठी संघटनेने आता थेट ११ सप्टेंबरपासून जिल्हाभर कामबंद आंदोलनाचा इशारा दिला असून, गादेगावचे ग्राम रोजगार सहाय्यक अरविंद सोनवणे हे मानोरा येथे सपत्नीक उपोषणास बसणार आहेत.

मानोरा तालुक्यातील गादेगाव ग्रामपंचायतीचे ग्राम रोजगार सहाय्यक अरविंद सोनवणे हे २४ ऑगस्ट रोजी हजेरीपत्रक पासिंगच्या कामासाठी मानोरा पंचायत समितीत गेले होते. यावेळी घरकुलाच्या कामावरून वाद निर्माण झाला. सोनवणे यांच्या तक्रारीनुसार, संबंधितांनी त्यांना शिवीगाळ करत चपलीने मारहाण केली तसेच जिवे मारण्याची धमकी दिली. या घटनेत जातीवाचक शिवीगाळ झाल्याचाही आरोप करण्यात आला आहे. घटनेनंतर सोनवणे तसेच मानोरा तालुका ग्राम रोजगार सहाय्यक संघटनेने पोलिस, तहसीलदार व गटविकास अधिकारी यांच्याकडे पुराव्यानिशी निवेदन सादर करून कारवाईची मागणी केली. मात्र, घटनेनंतरही अपेक्षित कारवाई झालेली नसल्याचा आरोप संघटनेने केला आहे.

यामुळे जिल्हा ग्राम रोजगार सहाय्यक संघटना आक्रमक झाली असून, ४ सप्टेंबर रोजी जिल्हाधिकारी, जिल्हा पोलिस अधीक्षक व मुख्य कार्यकारी अधिकारी यांना निवेदन देण्यात आले. आरोपींवर तात्काळ कायदेशीर कारवाई न झाल्यास ११ सप्टेंबरपासून जिल्ह्यातील ग्राम रोजगार सहाय्यक कामबंद आंदोलन करतील, असा स्पष्ट इशारा संघटनेने दिला आहे.

दरम्यान, या आंदोलनाला जिल्ह्यातील सर्व सहाही तालुक्यांतील ग्राम रोजगार सहाय्यकांचा पाठिंबा असल्याचे संघटनेने स्पष्ट केले आहे. 'अरविंद सोनवणे यांना न्याय मिळेपर्यंत माघार नाही,' अशी भूमिका घेत आरोपींवर कठोर कारवाई करण्याची मागणी संघटनेने केली आहे.

## कृषी मंत्र्याच्या पालक जिल्ह्यात शेतकऱ्यावर अन्याय , मिळेना न्याय !

• प्रभाकर नाईकवाडे @ केनवड •

जिल्ह्याचे पालकमंत्रीच कृषिमंत्री असताना जिल्ह्यातील शेतकऱ्याला मात्र नुकसानभरपाईसाठी वर्षभर प्रतीक्षा करावी लागत असल्याचे चित्र आहे. नेतन्सा येथील शेतकरी रामकृष्ण तुळशीराम बाजड यांच्या करडई पिकाला वीजवाहिनीतील बिघाडामुळे आग लागून मोठे नुकसान झाले होते. या प्रकरणाची विद्युत निरीक्षक, वाशिम कार्यालयामार्फत चौकशी करण्यात आली. चौकशीत वीजवाहिनीची योग्य देखभाल न झाल्याचे तसेच सुरक्षा व्यवस्थेत त्रुटी असल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर आगग्रस्त शेतकऱ्याला नियमानुसार नुकसानभरपाई देण्याचे निर्देश दि. १३ जनू २०२५ रोजी संबंधित कार्यकारी अभियंत्यांना देण्यात आले. मात्र, आदेश होऊन वर्ष पूर्ण झाले तरीही संबंधित शेतकऱ्याला अद्याप नुकसानभरपाई मिळालेली नाही.

### *वीजेच्या तारांने पीक जाळले, दोष सिद्ध होऊनही भरपाईचे पैसे अडल *नुकसानभरपाईचे निर्देश असूनही शेतकरी मदतीच्या प्रतीक्षेत

दि. ६ एप्रिल २०२५ रोजी नेतन्सा येथील गट नं. ३४५ मधील बाजड यांच्या शेतातील कापून ठेवलेल्या करडई पिकाला आग लागली. वादळी वाऱ्यामुळे लघुदाब वाहिनीचे वाय व बी फेजचे संवाहक तुटून जमिनीवर पडले. स्पार्किंग होऊन ठिणग्या पिकावर पडल्याने शेतात असलेले करडईचे पीक आणि शेतीपयोगी साहित्य जळून गेले.

चौकशीत वीजवाहिनीचे खांब झुकलेले, संवाहकांमध्ये झोळ आलेला, सुरक्षित अंतराचा अभाव आणि स्पेसर नसल्याचे आढळले. रोहित्र केंद्राच्या वितरण पेटीतील फ्युज अयोग्य क्षमतेच्या ?ल्युमिनिअम तारेने डायरेक्ट जोडण्यात आल्याने सुरक्षा व्यवस्था कार्यान्वित झाली नसल्याचेही अहवालात नमूद आहे. विद्युत




निरीक्षक कार्यालयाने हा अपघात विद्युतीय कारणामुळे झाल्याचे स्पष्ट करून महावितरणने आगग्रस्त शेतकऱ्याला नियमानुसार नुकसानभरपाई द्यावी, असे निर्देश दिले होते.

माझे एक हेक्टर क्षेत्रातील करडईचे पीक जळून गेले. तसेच , काही आंब्याची झाडे आणि दोन स्प्रिंकलर संच्याचेही नुकसान झाले आहे. मला नियमानुसार भरपाई मिळावी महावितरणच्या चुकीमुळेच पिक जळाले हे सिद्ध झाले. यासाठीचे पत्र मला मागील एक वर्षापूर्वी प्राप्त झाले. एक वर्ष होऊनही पत्र आले, मात्र मदत नाही आली. मी वारंवार संबंधित आमच्या येथील मांगुळझनक येथील इंजिनिअरशी संपर्क साधला असता व भेट घेतली असता, त्यांच्याकडून 'आमच्याकडे नसते' असे उत्तर मिळाले व 'तुम्ही वाशिमला जा, तीथे चौकशी करा' असे सांगण्यात आले. मी वारंवार चकरा मारत आहे. एकीकडे नुकसान झाले व दुसरीकडे चकरा मारून माझा वेळ, पैसा व मानसिक ताण वाढत आहे. नुकसान होऊनही जर मदत मिळत नसेल तर जगावं की मरावं, असा प्रश्न माझ्यासमोर उभा राहत आहे.'

**रामकृष्ण तुळशीराम बाजड,** नुकसानग्रस्त शेतकरी, नेतन्सा

मात्र आदेशाला वर्ष पूर्ण होऊनही भरपाई मिळत नसल्याने प्रश्न उपस्थित होत आहे. शेतकऱ्याच्या नुकसानीची चौकशी होऊन जबाबदारी निश्चित झाली, नुकसानभरपाईचे निर्देशही झाले; मग प्रत्यक्ष मदत मिळण्यास विलंब का? जिल्ह्याचे पालकमंत्रीच कृषिमंत्री असताना शेतकऱ्याच्या प्रश्नाकडे जिल्हात प्रशासनाचे दुर्लक्ष का? महावितरणकडून आदेशाची अंमलबजावणी कधी होणार? असा सवाल आता नुकसानग्रस्त शेतकरी आणि नागरिकांकडून उपस्थित होत आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट बुलडाणा
रविवार, दि. ६ सप्टेंबर २०२६ Web. http://epaper:citynewssuperfast.com



# पाणीपुरवठा व्यवस्थेची नगराध्यक्षांकडून पाहणी

## जळका भडंग, आवार फिल्ट्रेशन प्लांटचा आढावा

प्रतिनिधी ६ सप्टेंबर

**खामगाव** : शहरातील विविध भागांत पाणी पुरवठ्या बाबत नागरिकांकडून तक्रारी येत असल्याच्या पार्श्वभूमीवर नगराध्यक्षा अपर्णा फुंडकर यांनी गुरुवारी जळका भडंग, आवार येथील फिल्ट्रेशन प्लांट, तसेच शिर्ला नेमाने धरणाला भेट देत पाणीपुरवठा व्यवस्थेची प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी त्यांनी जलस्रोत, पाणी शुद्धीकरण प्रक्रिया आणि फिल्ट्रेशन प्लांटच्या कार्य प्रणालीचा आढावा घेत संबंधित अधिकाऱ्यांकडून माहिती जाणून घेतली. शहरातील पाणी पुरवठ्याबाबत आवश्यक खबरदारीच्या उपाययोजना परिस्थितीत करून लवकर सुधारणा करण्याच्या सूचना यापूर्वीच संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आल्या होत्या. त्याच अनुषंगाने नगराध्यक्षा फुंडकर यांनी प्रत्यक्ष ठिकाणी भेट देत पाणीपुरवठा व्यवस्थेची सद्यस्थिती तपासली.

यावेळी शिर्ला नेमाने धरणातील पाणीसाठा व पाणी पातळीची स्थिती, तसेच जळका भडंग आणि आवार येथील फिल्ट्रेशन प्लांटच्या कार्य प्रणालीची त्यांनी घेतली. पाणी शुद्धीकरण प्रक्रियेतील विविध टप्पे, वापरात असलेली यंत्रसामग्री आणि सध्या सुरु असलेल्या कार्य पद्धतीचीही त्यांनी पाहणी केली. नागरिकांना स्वच्छ आणि नियमित पाणीपुरवठा करणे हे नगरपरिषदेचे प्राधान्य असल्याचे सांगत, सध्याच्या व्यवस्थेत आवश्यक त्या सुधारणा करण्याच्या सूचना फुंडकर यांनी दिल्या. पाणी शुद्धीकरण प्रक्रियेची कार्यक्षमता वाढविण्यासाठी अद्ययावत तंत्रज्ञान, आधुनिक उपकरणे आणि आवश्यक यंत्र सामग्रीचा वापर करण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्याचे निर्देशही त्यांनी दिले. पाण्याच्या गुणवत्तेवर नियमित लक्ष ठेवण्याच्या सूचनाही दिल्या.

### तडजोड खपवून घेणार नाही- अपर्णा फुंडकर

» खामगाव शहरातील प्रत्येक नागरिकाला नियमित आणि स्वच्छ पाणी मिळणे ही नगरपरिषदेची प्राथमिकता आहे.
पाणी पुरवठ्याबाबत आवश्यक खबरदारीच्या उपाययोजना करण्याच्या सूचना यापूर्वीच देण्यात आल्या आहेत. त्याच अनुषंगाने संबंधित ठिकाणी प्रत्यक्ष भेट देऊन संपूर्ण व्यवस्थेचा आढावा घेतला आहे. नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित या महत्त्वाच्या विषयात कोणतीही तडजोड खपवून घेतली जाणार नाही, असे नगराध्यक्षा फुंडकर यांनी सांगितले.

# केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव पोहोचले शेतकऱ्यांच्या बांधावर!

## पावसाअभावी सुकत असलेल्या पिकांची केली पाहणी

प्रतिनिधी ६ सप्टेंबर

**खामगाव** : जवळपास एक महिन्याच्यावर झाले पावसाचा पत्ता नाही. त्यामुळे पिके सुकत असून, ती करपण्याची शक्यता आहे. याबाबत उपविभागीय अधिकाऱ्यांना निवेदन दिले होते. तसेच केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधवा यांना पिकांच्या माहिती देण्यात आली होती. याची दखल घेत ते आपला कोलकात दौरा सोडून ते मतदारसंघातील शेतकऱ्यांच्या बांधावर पोहोचून त्यांना धीर दिला. तसेच शेती पिकांची पाहणी करीत नुकसानग्रस्त पिकांचे तातडीने पंचनामे करून अहवाल सादर करण्याचे निर्देश संबंधित कृषी व महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांना दिले.

३१ ऑगस्ट रोजी शिवसेना खामगाव तालुक्याच्या वतीने उपविभागीय अधिकारी रामेश्वर पुरी यांना निवेदनाद्वारे ई केवायसी व पावसाने दडी मारल्यामुळे सुकलेल्या पिकांची पाहणी करून पंचनामे करण्याची मागणी केली होती. तसेच याविषयी मंत्री महोदयाच्या कानावर टाकण्यात आला आणि मंत्र्यांना सांगण्यात आले की, तालुक्यामधील ७० टक्के पिके पाण्याअभावी पूर्ण सुकून वाया गेले आहेत. तेव्हा मंत्र महोदय दिल्ली व उत्तराखंड मधील देहरादून पश्चिम बंगालमधील कोलकत्ता दौऱ्यावर होते. महत्त्वाचा दौरा सोडून कोलकत्ता येथुन सकाळी ३ वाजेला घरी पोहोचतात आणि थेट शेतकऱ्यांच्या बांधावर पोहचले. खामगाव मतदारसंघातील टेंभुर्णा, अटाळी, उमरा भिसे, अकोली, बोरी अडगाव, कदमापूर,दस्तापुर, शहापूर,वाहळा कंचनपुर,शिर्ला नेमाने इत्यादी गावांमधील पावसाने दडी मारल्यामुळे खरीप हंगामातील सुकत चाललेल्या पिकांची केंद्रीय मंत्री नामदार प्रतापराव जाधव यांनी प्रत्यक्ष शेतकऱ्यांच्या बांधावर जावून पाहणी केली व तातडीने पंचनामे करण्याचे निर्देश जिल्हा प्रशासनाला दिले आहेत. या संकटसमयी शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी सुकत चाललेल्या पिकांचे नुकसान किती झाले आहे, याचे अचूक मूल्यमापन करण्यासाठी जिल्हा आणि तालुका महसूल आणि कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांना प्रत्यक्ष शेतावर जाऊन पंचनामे करण्याचे निर्देश दिले आहेत.



### सरकार आपल्या पाठीशी आहे- जाधव

» शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी भरीव नुकसान भरपाई मिळावी याकरिता शासनाकडे पाठपुरावा करणार आहे. पावसाने दडी मारल्यामुळे हातातोंडाशी आलेली पिके डोळ्यांसमोर सुकत असताना, प्रत्यक्ष शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पाहणी केली आणि तातडीने पंचनामे करण्याचे निर्देश प्रशासनाला दिले आहेत. प्रत्येक गावातील शेतकऱ्यांना धीर देत 'सरकार आपल्या पाठीशी आहे' अशी ग्वाही ना. प्रतापराव जाधव यांनी दिली आहे.

# ध्येय ठेवून मार्गक्रमण करणारे यशस्वी ठरतात- डाक अधीक्षक जाधव

## खामगाव उपविभागाचा महासंकल्प मेळावा

प्रतिनिधी ६ सप्टेंबर

**पातुर्डा** : अनेकजण आपल्यापेक्षा हुशार आहेत. श्रीमंत आहेत. परंतु जीवनात अपयशी आहेत. कारण त्यांनी जीवनात ध्येय ठेवलेले नसते. ध्येय ठेवून त्यानुसार मार्गक्रमण करणारे हे यशस्वी ठरतात. चांगल्या कामावर आपले अस्तित्व आहे. जीवनात चांगल्या भावनेने प्रेरित होऊन काम करा आपल्या कामाचा, ज्ञानाचा उपयोग हा डाक विभागाच्या माध्यमातून नागरिकांना होईल यासाठी सदैव प्रयत्नरत रहा, असे विचार बुलढाणा डाक विभागाचे अधीक्षक गजेंद्र जाधव यांनी ५ सप्टेंबर रोजी शेगाव येथील खामगाव उपविभागाच्या महासंकल्प मेळाव्या प्रसंगी आयोजित बैठकीत केले.

या कार्यक्रमाला सहाय्यक डाक अधीक्षक मुख्यालय बुलढाणा के. के. तायडे, बुलढाणा उपविभाग सहाय्यक डाक अधीक्षक निकम, खामगाव उपविभाग सहाय्यक डाक अधीक्षक निळकंठ बावस्कार, मलकापूर उपविभाग डाक निरीक्षक मनोज दलाल, खामगाव पोस्ट मास्टर एस टी शाह, संग्रामपूर सब पोस्टमास्तर राम गोळे, शेगाव सब पोस्टमास्तर मुरलीधर पांडे, पातुर्डा सब पोस्टमास्तर दिलीप जोशी यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रास्ताविक डाक सहायक प्रल्हाद कचरे यांनी केले. इतनी शक्ती हमे देना दाताही सामूहिक प्रार्थना झाली. उपस्थित मान्यवरांनी यावेळी मार्गदर्शन केले. खामगाव उपविभागाचे सहाय्यक डाक अधीक्षक बावस्कर यांनी येणारा काळ हा टार्गेटचा आहे. निरंतर प्रयत्न करणारे हे नेहमी यशाला गवसणी घालू शकतात हे विविध उदाहरणासह पटवून दिले व पोस्टल कर्मचाऱ्यांनी सदैव प्रयत्न रहावे. असे आवाहन केले.

महासंकल्प निमित्ताने उल्लेखनीय कामगिरी करणारे ग्रामीण डाक सेवक तसेच मान्यवरांचा यावेळी सत्कार करण्यात आला. आभार डाक सहायक ओए अमोल पिंपळकर यांनी मानले.

# युगधर्म पब्लिक स्कूलमध्ये श्रीकृष्ण जन्माष्टमी व दहीहंडीचा जल्लोष

## बालगोपालांच्या उत्साहाने शाळेचा परिसर दुमदुमला; नाटिका, रासलीला व दहीहंडीने रंगला भक्तिमय सोहळा

प्रतिनिधी ६ सप्टेंबर

**खामगाव** : संस्कृती, परंपरा आणि भारतीय सणांचे महत्त्व विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभवातून समजावे या उद्देशाने युगधर्म पब्लिक स्कूल, खामगाव येथे श्रीकृष्ण जन्माष्टमी व दहीहंडी उत्सव मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुण्या सौ. श्वेता मधुर अग्रवाल यांची प्रमुख उपस्थिती लाभली. शाळेचे प्राचार्य श्री. अनिरुद्ध अवचार यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात श्रीकृष्ण पूजन व मंगलमय आरतीने झाली. यावेळी संपूर्ण वातावरण भक्तिमय झाले होते. विद्यार्थ्यांनी श्रीकृष्णाच्या विविध रूपांचे दर्शन घडविणारे सुंदर सादरीकरण केले.

कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरले ते म्हणजे शाळेतील वरिष्ठ शिक्षिका सौ. संगीता देशमुख मॅडम यांच्या संकल्पनेतून व मार्गदर्शनातून सादर करण्यात आलेली 'श्रीकृष्ण जन्म व रासलीला' ही लघुनाटिका. श्रीकृष्णाचा जन्म, बाललीला आणि रासलीलेचे प्रसंग विद्यार्थ्यांनी अत्यंत प्रभावीपणे सादर केले. या नाटिकेत शिक्षकांसोबत पालकांनीही उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

विशेष म्हणजे, अवघ्या १० महिन्यांच्या एका चिमुकल्याने बालकृष्णाची भूमिका साकारत उपस्थितांची मने जिंकली. या चिमुकल्या बालकृष्णाचे निरागस रूप कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण ठरले. पालकांचा सहभाग आणि विद्यार्थ्यांचा उत्साह यामुळे कार्यक्रमाला कौटुंबिक व आनंदमय स्वरूप प्राप्त झाले.

**दहीहंडीने वाढविला उत्साह**

श्रीकृष्ण जन्माष्टमीच्या उत्सवाला पारंपरिक रंग देण्यासाठी विद्यार्थ्यांसाठी दहीहंडी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी उत्साह, शिस्त आणि संघभावनेचे दर्शन घडवत तीन ते चार थरांचे मानवी मनोरे तयार केले. एकमेकांना प्रोत्साहन देत विद्यार्थ्यांनी दहीहंडी फोडण्यासाठी केलेल्या प्रयत्नांनी उपस्थितांमध्ये उत्साह संचारला.

इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांनी अत्यंत उत्साहाने व संघभावनेने दहीहंडी फोडत विजयाचा जल्लोष केला. 'गोविंदा आला रे आला'च्या जयघोषाने शाळेचा परिसर दुमदुमून गेला. विद्यार्थ्यांच्या उत्साहाला पालक व शिक्षकांनी टाळ्यांच्या कडकडाटाने दाद दिली.

**शिक्षक व कर्मचाऱ्यांचे विशेष योगदान**

या संपूर्ण कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सौ. संगीता देशमुख, सौ. नीलिमा मोहता, सौ. कांचन लोखंडे यांच्यासह शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. विद्यार्थ्यांच्या सहभागाचे नियोजन, नाटिकेची तयारी, रासलीला, दहीहंडी स्पर्धा तसेच संपूर्ण कार्यक्रमाचे व्यवस्थापन यासाठी सर्वांनी मनापासून योगदान दिले.

यावेळी प्रमुख पाहुण्या सौ. श्वेता मधुर अग्रवाल यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करत भारतीय संस्कृती आणि परंपरांशी विद्यार्थ्यांनी जोडले जाणे अत्यंत आवश्यक असल्याचे सांगितले. प्राचार्य श्री. अनिरुद्ध अवचार यांनी विद्यार्थ्यांना श्रीकृष्णाच्या जीवनातील प्रेम, मैत्री, कर्तव्य, धैर्य आणि संघभावना यांसारख्या मूल्यांची प्रेरणा घेण्याचे आवाहन केले.

विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे, पालकांच्या सहकार्यामुळे आणि शिक्षकांच्या अथक परिश्रमामुळे युगधर्म पब्लिक स्कूलचा श्रीकृष्ण जन्माष्टमी व दहीहंडी उत्सव आनंद, उत्साह आणि सांस्कृतिक वैभवाने परिपूर्ण ठरला. हा सोहळा विद्यार्थ्यांसह उपस्थित सर्वांसाठी अविस्मरणीय अनुभव ठरला.

# टॅबसह महत्त्वाची कागदपत्रे लांबवली; अज्ञात चोरट्यावर गुन्हा दाखल

प्रतिनिधी ६ सप्टेंबर

**मलकापूर:** अकोट ते जळगाव बसने प्रवास करणाऱ्या एका वैद्यकीय व्यावसायिकाची टॅब, पॅन कार्ड, ड्रायव्हिंग लायसन्स, एटीएम कार्ड्स आणि महत्त्वाची कागदपत्रे असलेली बॅग अज्ञात चोरट्याने लांबवल्याची घटना मलकापूर बसस्थानकावर घडली आहे. याप्रकरणी मलकापूर शहर पोलीस स्टेशनला अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, अकोला जिल्ह्यातील अकोट येथील रहिवासी अभिजित प्रमोद जवरकर (वय ३४) हे ३ ऑगस्ट रोजी अकोट ते जळगाव या एस.टी. बसने प्रवास करत होते. मलकापूर बसस्थानकावर पाणी पिण्यासाठी खाली उतरले असता त्यांनी आपली बॅग खाली ठेवली होती. पाणी पिल्यानंतर बॅग गायब असल्याचे त्यांच्या लक्षात आले. परिसरात शोध घेतला मात्र बॅग मिळून आली नाही.

त्या बॅगमध्ये लेनिनो कंपनीचा टॅब, पॅन कार्ड, ड्रायव्हिंग लायसन्स, व्होटर आयडी, विविध बँकांची क्रेडिट व डेबिट कार्ड्स तसेच कंपनीच्या कामाचे महत्त्वाचे साहित्य आणि कागदपत्रे होती. याप्रकरणी अभिजित जवरकर यांच्या तक्रारीवरून मलकापूर शहर पोलीस स्टेशनला अप.क्र. ६४६/२०२६ कलम ३०३(२) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोहेकॉ रवींद्र दळवी करत आहेत.

# शेगाव विकास आराखड्याच्या कामांना गती द्या- जिल्हाधिकारी

## अतिक्रमण, वाहतूक व्यवस्था व न्यायालयीन प्रकरणांचा आढावा

प्रतिनिधी ६ सप्टेंबर

**शेगाव** : शेगाव तीर्थक्षेत्र विकास आराखड्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यासोबतच भाविकांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी संबंधित यंत्रणांनी परस्पर समन्वयाने व प्राधान्याने कार्यवाही करावी, अशा सूचना सहआयुक्त कावेरी नाखले व जिल्हाधिकारी डॉ. प्रविणकुमार देवरे यांनी दिल्या. शेगाव येथील शासकीय विश्रामगृहासमोरील स्वागत कक्ष येथे तीर्थक्षेत्र विकास आराखड्यांतर्गत प्रलंबित विविध विषयांचा आढावा घेण्यासाठी बैठक घेण्यात आली. यावेळी उपविभागीय अधिकारी डॉ. रामेश्वर पुरी, न्यायालय मित्र फिरोज मिर्झा, शासकीय अभियोक्ता दीपक ठाकरे तसेच संबंधित विभागांचे कार्यालय प्रमुख उपस्थित होते.

शेगाव येथील मंदिराकडे जाणाऱ्या प्रमुख मार्गावर फेरीवाले व ऑटो रिक्षाचालकांकडून होणाऱ्या अतिक्रमणामुळे पादचारी, भाविक व नागरिकांना निर्माण होणाऱ्या अडचणींबाबत बैठकीत चर्चा करण्यात आली. अतिक्रमणामुळे वाहतूक व्यवस्थेवर होणारा परिणाम लक्षात घेऊन अतिक्रमण हटविण्यासाठी पोलीस विभाग व शेगाव नगरपरिषदेने केलेल्या कार्यवाहीचा आढावा घेण्यात आला. तसेच, शेगाव शहरातील आंबेडकर चौक परिसरात मोठ्या प्रमाणात होणारी गर्दी व वाहतुकीचे नियमन प्रभावीपणे करण्यासाठी पोलीस चौकी स्थापन करण्याच्या प्रस्तावावर चर्चा करण्यात आली. गर्दीचे नियमन, वाहतूक सुरळीत ठेवणे तसेच नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजना करण्याच्या सूचना संबंधित विभागांना देण्यात आल्या.

खळवाडी परिसरातील पुनर्वसन सदनिकांच्या वाटपाबाबत अप्पर जिल्हाधिकारी, बुलढाणा यांच्या अध्यक्षतेखाली गठित समितीने सादर केलेल्या अहवालाचा आढावा घेण्यात आला. २१ मार्च २०२४ रोजी झालेल्या आढावा बैठकीत आठ अपात्र धारकांकडून सदनिका ताब्यात घेण्याचे निर्देश देण्यात आले होते. त्यानुसार आठपैकी पाच अपात्र नागरिकांकडून सदनिका ताब्यात घेण्याची कार्यवाही पूर्ण करण्यात आली असून पात्र पाच लाभार्थ्यांना सदनिकांचे वाटप करण्यात आले आहे. उर्वरित तीन सदनिकांबाबत संबंधित नागरिकांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात स्वतंत्र रिट याचिका दाखल केल्या आहेत. संबंधित प्रकरणांमध्ये न्यायालयाने जैसे थे स्थिती कायम ठेवण्याचे आदेश दिल्यामुळे उर्वरित तीन सदनिकाताब्यात घेण्याची कार्यवाही प्रलंबित आहे. या प्रकरणांमध्ये विभागीय आयुक्त कार्यालय, अमरावती यांच्यामार्फत शासकीय अभियोत्तत्यांच्या माध्यमातून उच्च न्यायालयात आवश्यक पाठपुरावा करण्यात येत असल्याची माहिती बैठकीत देण्यात आली.

# तंबाखूजन्य पदार्थ विकणाऱ्यावर मलकापूर पोलिसांची कारवाई

प्रतिनिधी ६ सप्टेंबर

**मलकापूर:** कॉलेज परिसरात तंबाखूजन्य पदार्थांची बेकायदेशीर विक्री करणाऱ्या एका इसमावर मलकापूर शहर पोलिसांनी धाड टाकून कारवाई केली आहे.

सदरची कारवाई ४ सप्टेंबर रोजी दुपारी जनता कॉलेजसमोरील बुलडाणा रोडवर करण्यात आली.

मिळालेल्या माहितीनुसार, जनता कॉलेजसमोरील सार्वजनिक ठिकाणी बंदी असलेले तंबाखूजन्य पदार्थ विकले जात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्या आधारे पोलीस कॉन्स्टेबल सूरज चौधरी व त्यांच्या पथकाने पंचांसमक्ष त्या ठिकाणी छापा टाकला.

या कारवाईत आरोपी मोहम्मद जुनेद अब्दुल वाहब (वय ३८) रा.कुरेशी नगर, पारपेठ, मलकापूर याच्या ताब्यातून उंट बिडी, गुलाब तंबाखू आणि गाय छाप तंबाखू असा एकूण ४२० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

शैक्षणिक संस्थांच्या परिसरात तंबाखू विक्रीस बंदी असतानाही नियमांचे उल्लंघन केल्याने आरोपीविरोधात सिगारेट आणि इतर तंबाखू उत्पादने अधिनियमानुसार गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोहेकॉ रवींद्र दळवी करत आहेत.

# जिल्ह्यात रासायनिक गुलालाच्या उत्पादन, विक्री आणि वापरावर कायमस्वरूपी बंदी

## गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पर्यावरण संरक्षण कायद्यांतर्गत कारवाई

प्रतिनिधी ६ सप्टेंबर



**बुलढाणा** : गणेशोत्सवाच्या काळात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी तसेच पर्यावरणपूरक व सुरक्षित उत्सव साजरा व्हावा यासाठी बुलढाणा जिल्हा प्रशासनाने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. जिल्ह्यातील वाढते प्रदूषण आणि मानवी आरोग्यास होणारा धोका लक्षात घेता संपूर्ण बुलढाणा जिल्ह्यात रासायनिक गुलालाचे उत्पादन, विक्री, साठवणूक आणि वापरावर कायमस्वरूपी बंदी घालण्यात आली आहे. याबाबतचे अधिकृत आदेश जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी डॉ. प्रविणकुमार देवरे यांनी पर्यावरण (संरक्षण) अधिनियम १९८६ चे कलम ५ अन्वये जारी केले आहेत. आरोग्यासाठी घातक रसायने रासायनिक गुलालामध्ये लेड ऑक्साईड, कॉपर सल्फेट, क्रोमीयम आयोडाईड आणि ॲल्युमिनीयम ब्रोमाईड यांसारख्या घातक रसायनांचा वापर केला जातो. यामुळे १४ ते २५ सप्टेंबर २०२६ या कालावधीत श्री गणेशोत्सव साजरा होत आहे. या काळात मोठ्या प्रमाणावर रासायनिक गुलालाचा वापर केला जातो. पोलीस अधीक्षक, बुलढाणा यांनी जिल्हा प्रशासनाकडे दिलेल्या विनंतीनुसार यावर निर्बंध घालणे आवश्यक असल्याचे स्पष्ट करण्यात आले होते.

डोळ्यांची ॲलर्जी, अंधत्व, ब्रॉन्कीयल अस्थमा, स्किन ॲलर्जी आणि कर्करोगासारखे गंभीर आजार होण्याचा धोका असतो. तसेच हा गुलाल जलस्त्रोतांमध्ये मिसळल्यास मोठ्या प्रमाणावर जलप्रदूषण, माती व हवेचे प्रदूषण होते. संपूर्ण बुलढाणा जिल्ह्यात रासायनिक गुलालाचे हर्बल व नैसर्गिक गुलालाचा वापर करण्याचे आवाहन उत्पादन, विक्री, साठवणूक आणि वापरावर कायमस्वरूपी बंदी लागू करण्यात आली आहे.

# पूर्णा नदीकाठच्या शेतकऱ्यांचा वीजपुरवठा ठप्प; पिकांना पाणी देण्याचा प्रश्न कायम!

## पुरात विद्युत खांब, वाहिन्या व सिंचन साहित्य वाहून गेले

प्रतिनिधी ६ सप्टेंबर

**खामगाव:** पूर्णा नदीला ३१ जुलै रोजी पूर आल्याने जिगाव प्रकल्पाकडून नदीपात्रात उभारण्यात आलेली तात्पुरती मातीची भिंत फुटली व नदीकाठच्या परिसरात मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. पुराच्या पाण्यात पूर्णा नदीवरील अनेक विद्युत खांब, वाहिन्या व खांबावरील विद्युत साहित्य वाहून गेल्याने नदीकाठच्या शेतकऱ्यांचा शेतीसाठी आवश्यक वीजपुरवठा बाधित झाला आहे. वीजपुरवठा ठप्प झाल्याने खरीप पिकांना पाणी देणे कठीण झाले असून, उभी पिके वाचविण्याचे आव्हान शेतकऱ्यांसमोर उभे ठाकले आहे.

शेतकऱ्यांनी मोठा खर्च करून खरीप पिकांची लागवड केली आहे; मात्र सिंचनासाठी आवश्यक वीज उपलब्ध नसल्याने पिकांना पाणी देणे शक्य होत नाही.

**खांब उभारणीचाही खर्च शेतकऱ्यांवर!**

पूरपरिस्थितीत शेतकऱ्यांचे मोटार पंप, स्टार्टर, विद्युत पेट्या, केबल, सेक्शन पाईप, सिंचन साहित्य तसेच अन्य साहित्याचेही नुकसान झाले. शेतकऱ्यांच्या सिंचन व्यवस्थेचेही नुकसान झाले आहे. एक विद्युत खांब उभा करण्यासाठी २० ते २५ हजार रुपये खर्च येतो. त्यात खांबासह अन्य साहित्याचाही खर्च असल्याने प्रत्येक साहित्याची खरेदी करण्याची वेळ शेतकऱ्यांवर आली आहे.

### पंचनामा करण्याची मागणी

» महावितरणच्या संबंधित अधिकाऱ्यांनी नुकसानग्रस्त भागाची तातडीने पाहणी करून पंचनामा करावा. वाहून गेलेले विद्युत खांब, तारा, केबल व अन्य साहित्य उपलब्ध करून वीजपुरवठा युद्धपातळीवर पूर्ववत करावा, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

### पिकांना पाण्याची गरज, वीजपुरवठा ठप्प

» महिनाभरापासून पावसाचा थेंबही पडलेला नसल्याने शेतातील पिकांना सध्या पाण्याची नितांत गरज आहे. मात्र, नदीकाठच्या भागातील वीजपुरवठा ठप्प असल्याने मोटारपंप सुरू करता येत नाहीत. त्यामुळे पिकांना पाणी देणे अशक्य झाले असून, वीजपुरवठा तातडीने पूर्ववत न झाल्यास उभी पिके हातची जाण्याची भीती शेतकऱ्यांकडून व्यक्त होत आहे.

पुरामुळे नदीकाठच्या शेतकऱ्यांच्या शेतातील वीज खांब व इतर साहित्य वाहून गेले आहे. महिना उलटूनही वीजपुरवठा सुरळीत झाला नाही तर पिकांना पाणी कसे देणार, असा प्रश्न आहे.
- शेतकरी, टाकळी वतपाळ

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड

८

रविवार, दि. ६ सप्टेंबर २०२६ Web. http://epaper:citynewssuperfast.com

# शेवटच्या श्रावण सोमवारी शहरात गुंजणार हर्र बोला महादेवचा गजर

प्रतिनिधी ६ सप्टेंबर

## उद्या शहरात शिवभक्तांचा उसळणार जनसागर



**अकोला:** ज्या शेवटच्या श्रावण सोमवारची हजारो शिवभक्त मोठ्या आतुरतेने वाट पाहत होते तो दिवस उद्यावर येऊन ठेपला आहे. समस्त अकोला वासियांचे श्रद्धास्थान असलेल्या ग्रामदेवता श्रीराज राजेश्वर महाराजांचा जलाभिषेक करण्यासाठी सर्व शिवभक्त आतुर झाले आहेत. अकोला शहरातून 18 किलोमीटर दूर असलेल्या गांधीग्राम येथून पवित्र पूर्ण नदीचे जल आणण्यासाठी शहरातील शेकडो पालखी मंडळ व कावड मंडळ सज्ज झाले आहेत रविवारी दुपारपासूनच मिळेल त्या वाहनांनी शिवभक्त गांधीग्राम कडे रवाना झाले प्रत्येक मंडळाच्या कार्यकर्त्यांनी आपापल्या मंडळाच्या विशेष छापून घेतलेल्या टी-शर्ट सर्वांचेच लक्ष वेधून घेत आहेत. वाजत गाजत पालख्या व कावड घेऊन शिव मंडळ गांधीग्राम कडे रवाना होतील. मानाची पालखी असलेली महाराजांची पालखी सुद्धा गांधीग्राम कडे रवाना झाली त्याचबरोबर इतर मानाच्या पालख्या सुद्धा गांधीग्राम कडे रवाना झाल्या यावर्षी महिला शिवभक्त सुद्धा या कावड व पालखी महोत्सवात शामिल होणार आहेत. संपूर्ण पालखी मार्गावर शिवभक्तांचे तसेच पालख्यांचे स्वागत करण्यासाठी जागोजागी प्रवेशद्वार कमानी तसेच सामाजिक संघटना व राजकीय नेत्यांनी मोठमोठे बॅनर होल्डर लावले आहेत अनेक ठिकाणी केसरी रंगाच्या पताका सुद्धा लावण्यात आले आहेत एकूणच संपूर्ण वातावरण शिवमय झाल्याचे दिसून येत आहे. सोमवारी शहरात कावड व पालखी घेऊन येणाऱ्या हजारो शिवभक्तांना चहा नाष्टा महाप्रसाद फळे थंड पाण्याची व्यवस्था करण्याची तयारी अनेक सामाजिक संघटना तसेच राजकीय पक्षांतर्फे करण्यात आली आहे त्याचबरोबर अनेक कावड मंडळांनी सुद्धा आपल्या कावड व पालखीतील शिवभक्तांसाठी जेवणाची व्यवस्था करून घेतली आहे.

### यंदा कोणाची कावड मोठी याकडे सर्वांचे लक्ष

» दरवर्षी डाबकी रोड तसेच हरीहरपेट परिसरातील कावड मंडळांमध्ये कोणाची कावड जास्त कलशाची याची चढाओढ़ दिसून येते आपल्या कावडला किती कलश असतील याची माहिती हे दोन्ही शिव मंडळ आधी कोणालाच कळू देत नाहीत त्यामुळे यावर्षी कोणाची कावड जास्त कलशयांची असेल याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे

### यंदा पालखी व कावड मध्ये राहतील अनेक देखावे

» आपली कावड व पालखी सर्वात सुंदर व आकर्षक कशी राहील याकडे सर्वच शिवभक्तांचे नेहमीच लक्ष असते यंदा सुद्धा कावड व पालकांवर देवाधिदेव महादेवांच्या तसे त्यांच्या लाडक्या नंदीच्या मोठमोठ्या हरिहर महाराजांची मूर्ती जगन्नाथ पुरी येथील रथयात्रेची प्रतिकृती यंदा कावड यात्रेचे आकर्षण राहणार आहेत

### संपूर्ण कावड मार्गावर चोख बंदोबस्त व्यवस्था

» कावड व पालखी मिरवणूक शांततेत आणि सुरक्षित वातावरणात पार पाडावी यासाठी अकोला शहरात सुमारे 1500 पोलीस अधिकारी व कर्मचारी तैनात राहणार आहेत कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यावर पोलिसांनी विशेष भर दिला आहे यासाठी सीसीटीव्ही, ड्रोन कॅमेरे, वॉच टॉवर,पी ए सिस्टीम,नॉइज़ लेवल मीटर, तसेच ब्रेथ ऍनालायझर चा वापर करण्यात येणार आहे. तसेच शिवभक्तांच्या सुरक्षेसाठी गांधीग्राम येथील घाटावर शोध व बचाव पथके सुद्धा सज्ज ठेवण्यात आली आहे.







# हरिहर पेठ परिसर जय जगन्नाथ व श्री राम भजनांनी दणाणले

## प्राचीन हरिहर मंदिरातून शेकडो शिवभक्त गांधीग्रामकडे कावड यात्रेसाठी रवाना



प्रतिनिधी ६ सप्टेंबर

**अकोला :** संस्कार, आध्यात्मिकता व धार्मिक कार्यात सदैव अग्रेसर असलेल्या मानाच्या हरिहर शिवभक्त मंडळाच्या वतीने यंदा २८ व्या वर्षानिमित्त विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमांच्या मालिकेत शनिवारी सायंकाळी प्राचीन हरिहर मंदिर परिसरात शेकडो भाविकांच्या उपस्थितीत भोले राम की सेना यांच्या वतीने सामूहिक हनुमान चालीसा पठण व भजन संध्याचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी मंडळाचे अध्यक्ष मनीष प्राणझाळे यांच्यासह कार्यकर्त्यांच्या हस्ते कावडीवरील प्रथम कलश, श्रीगणेश, हरिहर महाराज व श्री जगन्नाथ प्रभू यांचे विधिवत पूजन करण्यात आले. त्यानंतर भोले राम की सेना यांच्या वतीने गणपती, शिव-पार्वती, प्रभू राम, हनुमानजी व श्री जगन्नाथ प्रभू यांच्या भक्तिगीतांचे सादरीकरण करण्यात आले. भक्तिमय वातावरणात रंगलेल्या भजन संध्येला भाविकांनी तालावर नृत्य करीत आनंदोत्सव साजरा केला.

कार्यक्रमाच्या समारोप प्रसंगी अकोल्याचे खासदार अनुप धोत्रे, भाजपा नेते व स्थायी समिती सभापती विजय अग्रवाल, महानगराध्यक्ष जयंत मसने, नगरसेवक व कार्यकर्ते अमोल मोहकार तसेच मंडळाचे अध्यक्ष मनीष प्राणझाळे आदी मान्यवरांच्या हस्ते महाआरती करण्यात आली. रविवारी सकाळी ११ वाजता कावड प्रस्थानापूर्वी कावड व कलश पूजनाचा कार्यक्रम पार पडला. यावेळी परिसरातील नागरिकांनी कावड यात्रेवर पुष्पवृष्टी करून शिवभक्तांना शुभेच्छा दिल्या. त्यानंतर प्राचीन हरिहर मंदिरातून शेकडो शिवभक्त व मंडळाचे कार्यकर्ते गांधीग्रामकडे कावड यात्रेसाठी रवाना झाले. या धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचा परिसरासह शहरातील शिवभक्तांनी मोठ्या संख्येने लाभ घेतला. यावेळी परिसरातील नागरिकांच्या वतीने स्व. भीमराव खोसे यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. दरम्यान, सोमवारी आयोजित कावड उत्सवात श्री जगन्नाथ प्रभू व हरिहर महाराज ११०० कलशांनी सुशोभित कावडीवर विराजमान होणार असून, या भव्य धार्मिक सोहळ्याचे दर्शन घेण्यासाठी शिवभक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन हरिहर शिवभक्त मंडळाच्या वतीने करण्यात आले.



# अकोल्यात जुगारावर धाड; 18 आरोपींसह लाखो रुपयांचा मुद्देमाल जप्त

## 'ऑपरेशन प्रहार'अंतर्गत १८ जुगारी पोलिसांच्या जाळ्यात

प्रतिनिधी ६ सप्टेंबर

**अकोला :** जुने शहर पोलिस स्टेशन हद्दीत सुरु असलेल्या जुगारावर 'ऑपरेशन प्रहार'अंतर्गत एल सी बीने मोठी कारवाई केली. पोलिसांनी छाप्यात १८ आरोपींना ताब्यात घेत १० लाख २७ हजार रुपयांहून अधिक मुद्देमाल जप्त केला.

अकोला जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांच्या सूचनेनुसार स्थानिक गुन्हे शाखेने अवैध धंद्यांविरोधात 'ऑपरेशन प्रहार' मोहीम तीव्र केली आहे. पोलीस निरीक्षक नितीन लेव्हरकर यांच्या नेतृत्वाखालील पथकाने मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे जुने शहर हद्दीतील एका घरावर छापा टाकला. या कारवाईत पत्त्यांचा जुगार खेळताना १८ जणांना रंगेहात पकडण्यात आले. पोलिसांनी घटनास्थळावरून १ लाख ६० हजार रुपये रोख, १ लाख ९७ हजार रुपये किमतीचे १४ मोबाईल आणि ६ मोटरसायकली असा एकूण १० लाख २७ हजार ७५० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. सदर स्था.गु.शा. पथकाने आज जुने शहर हद्दीत मो. रेहमान मो. इब्राहिम याच्या घरावरील हॉलमध्ये छापा कारवाई करून आरोपी १) वजीर खान अब्दुल्ला खान २) मोहसीन खान मोहम्मद खान ३) जाफर हुसैन तैजीब अली ४) जावेद खान शेर खान ५) अब्दुल रिजवान अब्दुल गणी ६) असलम अली शौकत अली ७) शेख वसीम शेख रशीद ८) शेख जुबेर शेख हबीब ९) सैयद इमरान सै इकबाल १०) मोहम्मद शाहीद मोहम्मद जावीद ११) मोहम्मद साहील शेख सलीम १२) मोहम्मद हनीफ मो. अनिस १३) शेख मुस्ताक शेख मुसा १४) अब्दुल अबरार अब्दुल नबी १५) शेख साजीद शेख निसार १६) शेख कयुम शेख करीम १७) जुनैद शाह सलीम शाह १८) शाकीर खान उर्फ पंपैया अहमद खान यांना ताब्यात १० लाख२७ हजारांचा मुद्देमाल हस्तगत करून जुने शह पोलिसांच्या ताब्यात दिले.

# भाजपच्या दहीहंडीचे मानकरी अनिकट हनुमान आखाडा पथक

## छत्रपती संभाजी पार्क मध्ये भव्य आयोजन



प्रतिनिधी ६ सप्टेंबर

**अकोला :** भारतीय जनता पक्षाच्या वतीने जवाहरनगर चौकात छत्रपती संभाजी पार्कमध्ये भव्य दहीहंडी चे आयोजन केले होते.

हनुमान आखाडा अनिकट च्या पथकाने प्रथम क्रमांक पटकावला. खासदार अनुप धोत्रे, आमदार रणधीर सावरकर, सभापती विजय अग्रवाल, महानगर अध्यक्ष जयंत मसने, अनिल मुरुमकार आणि मान्यवर उपस्थित होते. नगरसेविका सुनीता विजयजी अग्रवाल, नगरसेविका सौ. प्राची निलेश काकड, नगरसेवक विशाल श्रावणजी इंगळे यांचा आयोजनात मुख्य सहभाग होता. अॅड. वृशाली लुंगे, सोनलताई ठक्कर, रुपाली धोत्रे, संध्या गोडा, सुषमा जैन, स्वाती लटोरीया, पुजा मुरुमकार, किर्तीताई काबरा, ऋचाताई पाटील, रेणुका जानोरकर, स्वाती मानकर, रसिका पारधी, दिपाली राऊत, प्रियंका पोटे, योगिता माकोडे, प्रिती पाटील, सरिता शर्मा, रुपाली खरात, अनिता जायलवाल, योगेश मानकर, सुनिल जानोरकर, शरद ढगे, मोहनजी भगत, नरेश लटोरिया, दिपक जुनगडे, भावेश खिलोसिया, सुनिलजी फोकमारे, कपिल मुरुमकार, उकंडराव सोनोने, दिग्वीजय जोशी, अरविंद अग्रवाल, विजय केडिया, विनोद देशमुख, सुनील गिन्हे, संतोष सावरकर, किरण देशपांडे, रूपम घाटोळ, शेखर देशमुख, प्रशांत गावत्रे, प्रशांत देशमुख, मंगेश सोनटक्के, प्रशांत गावत्रे, हिमांशु शर्मा, मयुर राजेश शर्मा, जयंत लोनकर, गौरव भट्टड, बबलु वाघमारे, गोपाळ मंडाळे, प्रविण पोटे, मंगेश माकोडे उपस्थित होते.

# गांधीग्राम पूर्णा नदी येथे शोध व बचाव पथके सज्ज



प्रतिनिधी ६ सप्टेंबर

## दोन ठिकाणी शोध व बचाव पथक तैनात

**अकोला :** श्रावण महिन्यातील चौथ्या सोमवारच्या निमित्ताने रविवार रात्री पासून होणाऱ्या संभाव्य गर्दीच्या पार्श्वभूमीवर गांधीग्राम येथील पूर्णा नदीच्या घाटावर शोध व बचाव पथके पूर्णपणे सज्ज ठेवण्यात आली आहेत. कावड व पालखी धारकांनी प्रशासनाच्या सुचनांचे पालन करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

शहरातील वाहतुक व्यवस्थेत देखील बदल करण्यात आला आहे. जिल्हाधिकारी वर्षा मिना यांच्या आदेशानुसार, उपविभागीय अधिकारी आणि तहसीलदार यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व कावडी पूर्णपणे नदी ओलांडून जाईपर्यंत ही पथके कार्यरत राहणार आहे. गांधीग्राम येथे रविवार रात्रीपासून आपत्कालीन पथके तैनात केल्या गेली आहे. या पथकांकडे बोटी, लाईफ जॅकेट, लाईफ रिंग, रेस्क्यू रोप, आणि सर्च लाईट यांसारखी आवश्यक साधने उपलब्ध आहेत. याचबरोबर, मूर्तिजापूर तालुक्यातील लाखपुरी येथील पूर्णा नदीवरही बचाव पथके सज्ज ठेवण्यात आली आहेत. मूर्तिजापूर आणि दर्यापूर तालुक्यातील शिवभक्त मोठ्या संख्येने या ठिकाणी जल आणण्यासाठी येत असल्याने, तहसीलदार यांच्या मार्गदर्शनाखाली हे पथक २४ तास सतर्क राहणार आहे. भाविकांच्या सुरक्षिततेसाठी प्रशासनाने ही खबरदारी घेतली असून, दोन्ही ठिकाणी परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवले जाईल. दरम्यान, पालखी व कावड उत्सव पाहता शहरातील वाहतुक व्यवस्थेत बदल केला गेला आहे.

# अकोल्यात रॉयल चहा कट्ट्याला आग; प्रशासनाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह

प्रतिनिधी ६ सप्टेंबर

**अकोला :** शहरातील 'रॉयल चहा कट्टा' या टपरीला शनिवारी सकाळी अचानक आग लागली. अग्निशमन दलाच्या तत्परतेमुळे आग आटोक्यात आली असून, या घटनेने प्रशासकीय देखरेख आणि अतिक्रमणाचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आणला आहे. पुरवठा विभागाच्या दूर्लक्षामुळे शाळेसमोर ही घटना घटली आहे. जिल्हा रुग्णालय आणि जिल्हाधिकारी कार्यालयासारख्या अत्यंत महत्त्वाच्या शासकीय परिसरातील 'रॉयल चहा कट्टा' या टपरीला सकाळी चहा बनवत असताना अचानक आग लागली. या टपरीमध्ये घरगुती गॅस सिलेंडरचा बेकायदेशीर व्यावसायिक वापर होत असल्याची प्राथमिक शक्यता वर्तवली जात आहे.

घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाने तातडीने धाव घेत आगीवर नियंत्रण मिळवले, ज्यामुळे मोठा अनर्थ टळला. या घटनेत सुदैवाने कोणतीही जीवितहानी झालेली नाही. मात्र, रुग्णालय आणि शासकीय कार्यालयांच्या मुख्य मार्गावर मोठ्या प्रमाणात वाढलेले अतिक्रमण आणि सुरक्षेचे उघडलेले धिंडवडे यावर आता गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत. अशा धोकादायक टपऱ्यांवर प्रशासन कारवाई करणार की आणखी मोठ्या दुर्घटनेची वाट पाहणार, असा सवाल नागरिक विचारत आहेत. शासकीय वैद्यकिय महाविद्याल समोरच्या या रस्त्यावर रात्रीतून सुरु असलेल्या चौपाटीची तपासणी करण्याची गरज आहे. त्याच बरोबर या ठिकाणी अधिकृत गॅस कनेक्शन आहे की नाही याची तपासणी पुरवठा विभाग करेल काय अशी विचारणा होत आहे.

# एसटी प्रवाशांना दिलासा; मॅन्युअल सवलत तिकिटांना मुदतवाढ



प्रतिनिधी ६ सप्टेंबर

**अकोला :** एसटी महामंडळाच्या कार्ड प्रणालीच्या सर्व्हरवर ताण आल्याने ज्येष्ठ नागरिक व महिला प्रवाशांना दिलासा देणारा निर्णय घेण्यात आला आहे.

आता १४ सप्टेंबरपर्यंत सवलतीचे मॅन्युअल तिकीट देऊन प्रवास अनुज्ञेय करण्यात आला आहे.

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने १ सप्टेंबरपासून ज्येष्ठ नागरिक आणि महिला प्रवाशांसाठी एन सी एम सी कार्ड अनिवार्य केले होते. मात्र, एकाच वेळी मोठ्या संख्येने प्रवासी आल्याने सर्व्हरवर ताण येऊन सवलतीचे तिकीट मिळण्यात अडचणी निर्माण झाल्या होत्या. प्रवाशांच्या तक्रारींची दखल घेत महामंडळाने १४ सप्टेंबर २०२६ पर्यंत सवलतधारकांना मॅन्युअल तिकिटावर प्रवास करण्यास मान्यता दिली आहे. तसेच ज्यांनी कार्डसाठी नोंदणी केली आहे पण कार्ड मिळालेले नाही, त्यांना पावती दाखवून ३० सप्टेंबरपर्यंत सवलतीचा प्रवास करता येईल.

यासोबतच ऑनलाईन बुकिंग केलेले प्रवासी, गणेशोत्सवाचे ग्रुप बुकिंग आणि तीर्थाटन योजनेतील प्रवाशांनाही एन सी एम सी कार्डशिवाय सवलतीच्या दरात प्रवासाची मुभा देण्यात आली आहे. यामुळे सण-उत्सवाच्या काळात एसटी प्रवाशांना मोठा दिलासा मिळाला आहे.

# गाडगे नगर हद्दीतील जुगारावर धाड!



प्रतिनिधी ६ सप्टेंबर

**अमरावती:** गुन्हे शाखा युनिट क्रमांक १, अमरावती शहर येथील अधिकारी व अंमलदार यांनी ५ सप्टेंबर रोजी गाडगेनगर पोलिस स्टेशन हद्दीत खैरीया नगर येथे जुगारावर छापेमारी करुन एकास ताब्यात घेतले. तसेच १० हजार ३०० रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी आरोपी विरुध्द पो.स्टे. गाडगेनगर येथे कलम १२ (अ) म.जु.का. प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला. जुगार मध्ये ताब्यात घेण्यात आलेले आरोपी नाव-शेख अलबक्श शेख मन्नान वय उर्फ गोलु २४ वर्ष रा. अलहीलाल कॉलनी, अमरावती असे आहे. हीr कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपआयुक्त यशवंत सोळंके (परिमंडल १), प्रांजली सोनावणे, पोलीस उपाआयुक्त (मुख्यालय), तसेच सहायक पोलीस आयुक्त (गाडगेनगर विभाग) निलेश ब्राम्हणे यांचे मार्गदर्शनाखाली व.पो. नि. दिनेश दहातोंडे सा. सपोनि मनीष वाकोडे, सपोनि दशरथ आडे, सहा. पोउपनि फिरोज खान, पोहवा मंगेश लोखंडे, पोहवा संभाजी केन्द्रे, पो.हवा. संजय भारसाकळे, पो.हवा. नाझिमोद्दीन सैयद, पो.ना. सचिन भोयर, पोलीस अमलदार रंजित गावंडे, नरेश मोहरिल, सागर ठाकरे, निखील गेडाम, चालक- चेतन शर्मा, प्रभात पोकळे गुन्हे शाखा, अमरावती शहर यांनी केलेली आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी सायरन ऑफसेट प्रिंटर्स एमआयडीसी क्र. २ पोलिस स्टेशन समोर ता. जि. अकोला येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले.
■ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ■ संपर्क - ०७२४ - २४३५५७३, २४४४७७४ ■ email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642, RRC Helpline No. 8484842135